पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
CorelDRAW Ps Ai Id
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005



# दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25



काजळे ज्वेलर्स
Diamond Jewellery Launching
(Coming Soon)
Vacancy for
4 Sales Officers
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर
मो. 9601222777, 9615222777



वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ११८। किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) रविवार । १७/०५/२०२६ । पाने - ६



लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून राजेन्द्र विश्वासाची सार्थ परंपरा...


## संगमनेरमध्ये पेट्रोल 107, डिझेल 94 रुपयांच्या पुढे

### तीन रुपयांपेक्षा अधिक वाढ : अनेक ठिकाणी पुरवठा विस्कळीत

संगमनेर (प्रतिनिधी) - पेट्रोल-डिझेलच्या किमतीत शुक्रवारपासून देशभरात ३ रुपयांची दरवाढ झाल्यानंतर अहिल्यानगर शहरात पेट्रोल १०७ रुपये, तर डिझेल ९४ रुपयांपुढे पोहोचले आहे. तर संगमनेर शहरात पेट्रोल जवळपास १०८ रुपये (१०७.९१) व डीझेल ९४.४१ रुपयांवर पोहोचले आहे. दरम्यान, कोठेही इंधनाचा तुटवडा नाही, अशी माहिती जिल्हा पुरवठादार असोसिएशनने दिली.



एआय जनरेटेड इमेज

सार्वजनिक क्षेत्रातील ऑइल मार्केटिंग कंपन्यांनी पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत देशभरात ३ रुपयांनी वाढ केली आहे. परंतु वेगवेगळ्या शहरात प्रत्यक्षात ही वाढ तीन रुपयांपेक्षा अधिक झाली आहे. शुक्रवारी १४ मे रोजी याबाबत अधिकृतपणे घोषणा करण्यात आली. मागील चार वर्षात पहिल्यांदाच या किमतीत वाढ झाली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर कच्च्या तेलाचे भाव वाढल्याने तेल कंपन्यांना महिन्याला १६००० कोटींपेक्षा जास्त तोटा सहन करावा लागत होता. त्यामुळे ही दरवाढ झाल्याचे कंपन्यांकडून सांगण्यात येत आहे. दरम्यान अहिल्यानगरमध्ये पेट्रोलची किंमत वाढून आता १०७ वर गेली आहे, तर डिझेलची किंमत वाढून ९४.११ रुपये प्रति लिटर झाली आहे. तर संगमनेर शहरात पेट्रोल १०७. ९३ तर डीझेल ९४.४१ इतकी भाववाढ झाली आहे. नगर जिल्ह्यात मनमाड आणि अकोळनेर (ता. नगर) येथील डेपोतून इंधनाचे टँकर भरले जातात. त्यामुळे इंधनाचे दर अंतरानुसार काही पैशात कमी-जास्त होतात.

दरम्यान, दरवाढीमुळे गुरुवारी अनेक ठिकाणी पंप बंद केले, अशी अफवा पसरली होती. मात्र, मुद्दामहून कोणी पंप बंद केले नाहीत. दरवाढीच्या शक्यतेमुळे अनेकांनी सायंकाळी गर्दी करून इंधन भरून घेतले. अचानक गर्दी झाल्याने रात्री पंपांचे इंधन संपले. त्यामुळे अनेक पंपांवर गुरुवारी रात्री इंधन मिळत नव्हते. अशी माहिती पेट्रोल पंप चालकांनी दिली.

## मनोज जरांगेंचा पुन्हा एल्गार

### मराठा आरक्षणासाठी ३० मे पासून उपोषण?



जालना (युवावार्ता वृत्तसंस्था) - माझे देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल वाईट मत नाही. पण माझ्या समाजाचे वाटोळे होणार असेल तर मी तुम्हाला कोणालाच मोजणार नाही. मला मित्र नको, मंत्र्यांशी संबंध नको मला केवळ माझ्या समाजाचे लेकरं मोठी करायची आहेत. मी फडणवीस यांना दोष देत नाही माझं म्हणणं केवळ इतके आहे की हैदराबादचा जीआर काढला पण प्रमाणपत्र रोखले का नाही? ते आता बंद कसे झाले? तुम्हाला मुख्यमंत्री मराठ्यांनीच केले आहे हे लक्षात ठेवा, असे मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. ३० तारखेपासून आंदोलन करणार असल्याची घोषणा मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. ३० मे पूर्वी सर्वांना प्रमाणपत्र द्यावे, नाही तर ३० तारखेपासून आमरण उपोषण करणार, असे त्यांनी म्हटले आहे.

मराठा आरक्षणासाठी सरकारने सातारा संस्थानच्या गॅझेटचा जीआर काढू असे सरकारने सांगितले होते पण तसे काही केले नाही, आंदोलन केल्याशिवाय सरकार काही ऐकत नाही. हैदराबाद गॅझेटनुसार ३०८ का असेना नोंदी निघाल्या ना? अधिकारी सांगतात सरकारने आदेश दिले नाही, मग काय आमच्या पोरांचे वाटोळे झाल्यावर सरकार आदेश देणार का? असा सवाल मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे.

मनोज जरांगे म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांना वाटत असेल की तेच हुशार आहेत पण शेतकरी सुद्धा फार हुशार आहे. तुम्ही आमचे प्रमाणपत्रे रोखले आहे. प्रमाणपत्र सरकारने रोखले आहेत. फडणवीस यांनी एक भाषण केले होते की मंत्र्यांना किंमत नाही, मुख्यमंत्रीच सर्व काही असतो. मग आमचे प्रमाणपत्र सुद्धा तुम्हीच रोखले आहेत. सरकारने हैदराबाद गॅझेटचा जीआर लागू झाला आहे. कुणबी प्रमाणपत्र देणं अचानक का बंद झाले. तुम्ही प्रमाणपत्र द्या आणि समाजाचे मन जिंका आम्हाला सत्ता नको. फडणवीस तुम्ही नाही तुमच्या ५० पिढ्या जरी आल्या तरी मी मराठ्यांना धक्का सुद्धा लागू देणार नाही.

(पान नं. २ वर पुढे)

## थोरात कारखान्याच्या वतीने ऊस विकास मेळावा

### १७ ते १९ मे दरम्यान जोर्वे, खांडगाव ,साकुर व तळेगाव येथे शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन




### ऑस्ट्रेलियातील ऊस संशोधन संस्थांच्या अभ्यास दौऱ्याचे शेतकऱ्यांना त्वरीत मार्गदर्शन आवश्यक - मा. मंत्री थोरात

महाराष्ट्रातील ऊस शेती आणि साखर उद्योग अधिक आधुनिक, संशोधनाधारित व जागतिक स्पर्धात्मक बनविण्याच्या उद्देशाने पुणे येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट (व्हीएसआय) च्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाने ऑस्ट्रेलियातील विविध जागतिक दर्जाच्या ऊस संशोधन संस्था, प्रगत प्रयोगशाळा, फिनॉमिक्स केंद्रे, स्पीड ब्रीडिंग सुविधा तसेच आधुनिक साखर कारखान्यांना भेट देत सविस्तर अभ्यास दौरा केला.

या शिष्टमंडळामध्ये माजी मंत्री तथा व्हीएसआय नियामक मंडळ सदस्य मा. बाळासाहेब थोरात, मा. राजेश टोपे यांच्यासह पीक उत्पादन व संरक्षण विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. अशोक कडलग, ऊस प्रजनन विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सुशीर कपिल आणि रेणूजीवशास्त्र व जनुकीय अभियांत्रिकी विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. अशोक जगताप यांचा समावेश होता.

या अभ्यास दौऱ्यामुळे महाराष्ट्रातील ऊस शेतीमध्ये आधुनिक जैवतंत्रज्ञान, स्पीड ब्रीडिंग, फिनॉमिक्स, रोग व्यवस्थापन आणि हवामान बदलास प्रतिकारक्षम ऊस जाती विकासासाठी नवे तंत्रज्ञान उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. भविष्यात व्हीएसआय आणि ऑस्ट्रेलियातील संशोधन संस्थांमध्ये संयुक्त संशोधन प्रकल्प, विद्यार्थी व शास्त्रज्ञ देवाणघेवाण तसेच तांत्रिक सहकार्याचे नवे मार्ग खुले होतील. या सर्वाचा आढावा ऊस विकास मेळाव्याच्या माध्यमातून होणार असल्याचे माजी महसूल व कृषी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सांगितले.

संगमनेर (प्रतिनिधी)-सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या वतीने रविवार दिनांक १७ मे २०२६ ते १९ मे २०२६ या कालावधीमध्ये तालुक्यात विविध ठिकाणी माजी कृषिमंत्री बाळासाहेब थोरात व माजी आमदार डॉ.सुधीर तांबे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ऊस विकास मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती उपाध्यक्ष पांडुरंग घुले यांनी दिली आहे.

कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस लागवड क्षेत्रात प्रती हेक्टरी वाढ व्हावी याकरता मा. मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली थोरात साखर कारखान्याच्या वतीने ऊस विकास मेळाव्यांचे आयोजन होत आहे.

रविवार दिनांक १७ मे २०२६ रोजी सकाळी साडेनऊ वाजता जोर्वे येथील शिव ओंकार लॉन्स येथे हा ऊस विकास वाढ मेळावा होणार आहे. यावेळी मा महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या सर्व पदाधिकारी व त्या त्या विभागातील कार्यकर्ते व मान्यवर उपस्थित राहणार आहे. यावेळी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट मधील मधील कृषी शास्त्रज्ञ व तंत्रज्ञान विभागातील मुख्य शास्त्रज्ञ डॉ. अशोक कडलग त्याचप्रमाणे कृषी विद्या विभागाचे डॉ. अभिनंदन पाटील, माती परीक्षण विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. समाधान सुरवसे व ऊस पैदासकार विभागातील मुख्य शास्त्रज्ञ डॉ. सुशील कपिल ही उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. रविवार १७ मे रोजी सायंकाळी पाच वाजता खंडेश्वर मंदिर सांस्कृतिक भवन येथे हा मेळावा होणार आहे तर सोमवार दिनांक १८ मे २०२६ रोजी सायंकाळी पाच वाजता साकुर येथील वीरभद्र लॉन्स येथे हा ऊस विकास मेळावा होणार आहे. मंगळवार दिनांक १९ मे २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता तळेगाव दिघे येथील महाराजा लॉन्स येथे वरील मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये ऊस विकास मेळावा होणार आहे.

तरी या ऊस विकास मेळाव्यासाठी कार्यक्षेत्रातील व तालुक्यातील सर्व सभासद, शेतकरी, ऊस उत्पादक, कार्यकर्ते, नागरिक ,युवक व महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सर्व संचालक मंडळ, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर व शेतकी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## विराट हिंदू संमेलन उत्साहात




### हिंदुत्व, राष्ट्रभक्ती व हिंदू समाजजागृतीचा संदेश

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी) : शहरातील मालपाणी लॉन्स येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेला विराट हिंदू संमेलन सोहळा शुक्रवारी सायंकाळी मोठ्या उत्साहात आणि दिमाखदार वातावरणात संपन्न झाला. धार्मिक, सामाजिक व राष्ट्रीय विचारांचा संगम घडवणाऱ्या या कार्यक्रमाला विविध क्षेत्रांतील मान्यवरांसह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. संपूर्ण परिसर सनातन व देशभक्तीपर घोषणांनी आणि उत्साही वातावरणाने भारावून गेला होता.

कार्यक्रमाची सुरुवात नीलांबरी कोर्टीकर यांनी सादर केलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या देशभक्तीपर गीतांनी झाली. त्यांच्या प्रभावी सादरीकरणाने उपस्थितांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना जागृत झाली. त्यानंतर सर्व उपस्थितांनी श्रीराम नवमी हनुमान जयंती उत्सव समितीच्या महिला शक्ती सदस्यांसोबत सामुदायिक रामरक्षा आणि हनुमान चालीसा पठण करून धार्मिक व आध्यात्मिक वातावरण निर्माण केले. सामूहिक प्रार्थनेमुळे कार्यक्रमाला भक्तिमय आणि प्रेरणादायी सुरुवात मिळाली. शुभम उपाध्ये यांनी संघगीत सादर केले. प्रजापिता ब्रह्मकुमारी विश्व विद्यालयाच्या अनिता दीदी यांनी मेडिटेशन करून घेतले आणि मेडिटेशनचे महत्त्व सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रखर हिंदुत्ववादी विचारवंत एस. झेड. देशमुख सर यांनी केले. हिंदू समाजाने संघटित राहण्याची आवश्यकता, सामाजिक जबाबदारी आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन करण्याचे महत्त्व त्यांनी आपल्या भाषणातून अधोरेखित केले.

यानंतर गांगुर्डे गुरुजी यांनी संघकार्याची परंपरा, स्वयंसेवकांची भूमिका आणि पंचसूत्रीच्या माध्यमातून समाजजीवनात सकारात्मक परिवर्तन कसे घडवता येते, याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी युवकांनी राष्ट्रहित आणि समाजसेवा या मूल्यांचा स्वीकार करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते सीए सर्वेश मेहेंदळे यांनी अत्यंत ओजस्वी, अभ्यासपूर्ण आणि प्रभावी भाषण केले. इतिहासातील विविध घटनांचा संदर्भ देत शिवाजी महाराजांची सामाजिक रचना आणि वर्तमानकाळातील बदलांची आवश्यकता त्यांनी स्पष्ट केली.

उर्वरीत वृत्त (पान नं. २ वर)










# पो.नि. प्रवीण साळुंखे यांना पोलीस महासंचालक पदक

**१५ वर्षांच्या गुणवत्तापूर्ण सेवेला मानाचा तुरा**



संगमनेर (युवावार्ता - प्रतिनिधी)

ज्या संगमनेर तालुक्यात पोलीस सेवेला सुरुवात केली, त्याच संगमनेर तालुक्यात पोलीस निरीक्षक म्हणून पदभार स्वीकारण्याचा मान मिळाला आणि आता त्याच भूमीत १५ वर्षांच्या गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पोलीस महासंचालक पदक मिळणे हा माझ्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे, अशा भावना संगमनेर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रवीण पुंडलिक साळुंखे यांनी व्यक्त केल्या.

पोलीस सेवेत उल्लेखनीय, कर्तव्यदक्ष आणि धाडसी कामगिरीबद्दल प्रवीण साळुंखे यांना पोलीस महासंचालक पदकाने गौरविण्यात आले. हा सन्मान पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला.

संगमनेरशी असलेले भावनिक नाते व्यक्त करताना साळुंखे म्हणाले की, संगमनेर तालुक्याने मला भरभरून प्रेम आणि ओळख दिली. संवेदनशील शहर म्हणून ओळख असलेल्या संगमनेरमध्ये पोलीस उपनिरीक्षक म्हणून काम करताना मिळालेला अनुभव राज्यातील इतर ठिकाणी काम करताना अत्यंत उपयुक्त ठरला.

प्रवीण साळुंखे यांनी आपल्या सेवाकाळात अनेक धाडसी आणि उल्लेखनीय कामगिरी केली आहे. संगमनेर शहर पोलीस ठाण्यात कार्यरत असताना त्यांनी अनेक क्लिष्ट गुन्ह्यांचा यशस्वी तपास लावला. हिंदू-मुस्लिम तणावाच्या काळात परिस्थिती नियंत्रणात ठेवत कणखर भूमिका बजावून त्यांनी दबंग अधिकारी म्हणून वेगळी ओळख निर्माण केली.

हर्सूल येथे आदिवासी समाजाच्या दंगलीच्या वेळी परिस्थिती नियंत्रणात आणण्यापासून ते मनमाड पोलीस ठाण्यात असताना येवला येथील ५० लाखांच्या रोकड चोरीचा गुन्हा अवघ्या २४ तासांत उघडकीस आणण्यापर्यंत त्यांनी आपल्या तपास कौशल्याची छाप उमटवली. कोविड काळात नशिराबाद येथे प्रभारी अधिकारी म्हणून उल्लेखनीय कामगिरी केली, तर पलूस येथे बनावट अपघाताच्या आड दडवलेला खून उघडकीस आणत गुन्हेगारांना बेड्या ठोकल्या. तसेच गुन्हे अन्वेषण विभाग (उखऊ) नंदुरबार येथे प्रलंबित व जटिल गुन्ह्यांचा छडा लावत त्यांनी प्रभावी कामगिरी बजावली. सध्या संगमनेर तालुका पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात गुन्हे विहित वेळेत निकाली काढणे आणि कायदा-सुव्यवस्था राखणे यामध्येही त्यांचे योगदान महत्त्वाचे मानले जात आहे.

कर्तव्यनिष्ठा, धाडस आणि प्रभावी नेतृत्वाच्या जोरावर पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांना मिळालेला हा सन्मान संगमनेरसाठीही अभिमानाची बाब ठरत आहे.

# राखीव प्रवर्गातील परीक्षार्थींना खुल्या जागांपासून दूर ठेवणे अन्यायकारक : माकप



अकोले (युवावार्ता प्रतिनिधी) राज्य मंत्रिमंडळाने राखीव प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील जागांवर संधी नाकारण्यासंदर्भात घेतलेल्या निर्णयावर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने तीव्र आक्षेप नोंदवला आहे. हा निर्णय आरक्षणाच्या मूळ तत्त्वांनाच धक्का देणारा असून सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला बाधा पोहोचवणारा असल्याची भूमिका पक्षाने मांडली आहे. राज्य सरकारकडून आरक्षणाचे एकूण प्रमाण ७२ टक्क्यांपर्यंत पोहोचल्यामुळे खुल्या प्रवर्गातील जागांवर ताण वाढल्याचा युक्तिवाद करण्यात येत आहे. खुल्या प्रवर्गातील स्पर्धा कमी करून सर्वांना समान संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे सरकारचे म्हणणे आहे.

मात्र, आरक्षणाचा मूलभूत हेतू समान संधी देणे नसून सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांना विशेष संधी उपलब्ध करून देणे हा आहे, असे माकपचे राज्य सचिव डॉ. अजित नवले यांनी स्पष्ट केले. सामाजिक विषमता दूर करून वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सकारात्मक भेदभावाच्या तत्त्वावर आरक्षणाची रचना करण्यात आली आहे. त्यामुळे सरकारच्या निर्णयामुळे आरक्षणाच्या मूळ संकल्पनेलाच धक्का बसण्याची शक्यता असल्याचे त्यांनी म्हटले आहे. राज्यात सध्या विविध मागास प्रवर्गांसाठी ६२ टक्के आरक्षण लागू असून आर्थिक दुर्बल घटकांसाठी (एथड) स्वतंत्र १० टक्के आरक्षण लागू आहे. नव्या निर्णयामुळे खुल्या प्रवर्गातील आरक्षणाचे स्वरूप बदलून त्याचा लाभ विशिष्ट घटकांपुरता मर्यादित होण्याची शक्यता असल्याचा दावा माकपने केला आहे.

मराठा आरक्षण आंदोलनानंतर अनेकांना कुणबी दाखल्याच्या माध्यमातून ओबीसी प्रवर्गात प्रवेश मिळाल्याने खुल्या प्रवर्गातील लोकसंख्येचे नेमके प्रमाण किती आहे, याबाबत अद्याप स्पष्टता नसल्याकडेही पक्षाने लक्ष वेधले आहे. राज्यातील सर्व समाजघटकांची जातनिहाय जनगणना झाल्यानंतरच या विषयाचे वास्तव चित्र समोर येऊ शकेल. पुरेशी आकडेवारी आणि वस्तुनिष्ठ पडताळणी न करता अशा निर्णयांची अंमलबजावणी करू नये, अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने केली आहे.

# मनोज जरांगेंचा पुन्हा एल्गार..

(पान नं. १ वरून)

मनोज जरांगे म्हणाले की, आंदोलनाच्या तारखेच्या आत जर कुणबी प्रमाणपत्र दिले नाही तर भयानक आंदोलन होणार. ५८ लाख कुणबी नोंदी सापडल्या आहेत त्याचे प्रमाणपत्र वाटप करा. काम करा नाही तर सर्वांना पट्ट्यावर घेतो. प्रमाणपत्र दिल्याशिवाय सरकारला सुटी नाही. सातारा संस्थानचा जीआर तुम्ही का काढत नाही? असा सवाल सुद्धा जरांगे यांनी केला आहे.

मनोज जरांगे म्हणाले की, मराठा समाजाचे मुले अधिकारी होताय म्हणून सरकार जळायला लागले आहे. म्हणून ते समाजाला प्रमाणपत्र देत नाही. मराठ्यापुढे शहानपण चालत नाही. सरकारकडून मराठा-कुणबी प्रमाणपत्र देण्यास टाळाटाळ सुरू आहे. सरकारला आपल्या मराठा समाजाबद्दल इतका द्वेष का आहे? मराठा समाजाचे नेते जर पक्षाच्या बाजूने राहिले तर तुमच्या मुलांचे नुकसान होईल. पक्ष वाढवण्याच्या नादात जात वाढणार नाही. म्हणून पक्षाचा नाही तर आपल्या लेकरांचा विचार करा.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आज त्या विषयावर ११ वाजता सर्वांशी चर्चा करू आणि ठरवू. पण आंदोलन केल्याशिवाय सरकार काही वठणीवर येत नाही. सरकारकडून गोड बोलून फसवण्याचे काम अनेक वेळा झाले आहे. पण राज्यात मराठ्यांची मोठी ताकद आहे. ती सरकारने बघितली आहे. सरकारने पुन्हा पुन्हा आमच्यावर ती वेळ येऊ देऊ नये. पण आता आंतरवाली सराटीमध्ये खूप मोठे आंदोलन होणार आहे. जीआर काढला, अंमलबजावणी केली पण ते प्रमाणपत्र द्यायचे कधी आता ॲडमिशन सुरू झाले आहेत. सातारा गॅझेटचा जीआर कधी काढणार? असा सवाल जरांगे यांनी केला आहे. आंदोलनाचे स्वरुप सांगितले नाही म्हणूनच मी टिकलो आहे. दिल्लीला आरक्षणासाठी जायचे नाही, ते दिल्ली पाहण्यासाठी जायचे आहे. जी तारीख आज घोषित करण्यात येईल त्याच दिवशी आंदोलन करण्यात येईल.

# विराट हिंदू संमेलन उत्साहात

(पान नं. १ वरून)

तसेच गोरक्षकांवर दाखल होणाऱ्या प्रकरणांमध्ये समाजाने नैतिक व सामाजिक पाठबळ देण्याची गरज त्यांनी मांडली. हिंदू समाजासमोरील विविध आव्हाने, सांस्कृतिक सुरक्षेचे प्रश्न, सर्व प्रकारचे जिहाद तसेच त्यावरील उपाययोजना यावर त्यांनी सविस्तर भाष्य केले.

या कार्यक्रमासाठी संगमनेर विधानसभेचे आमदार अमोलभाऊ खताळ व नीलमताई खताळ तसेच संजयजी मालपाणी आवर्जून उपस्थित होते. त्याचबरोबर विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे वारकरी संप्रदायाने मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रोत्साहन दिले. ह.भ.प. दत्तात्रयजी भोर महाराज, ह.भ.प. सखारामजी तांगडे महाराज, ह.भ.प. बाळकृष्णजी कर्पे महाराज, पू. दयानंदजी महाराज (खांडेश्वर मंदिर), श्री स्वस्तिक महाराज (कोंची) तसेच ह.भ.प. रोहिणीताई राऊत हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्मिता गुणे यांनी प्रभावी, नेटक्या आणि ओघवत्या शैलीत केले. संपूर्ण कार्यक्रमात शिस्तबद्ध वातावरण आणि उत्साह कायम राहिला.

समारोप वेदांगी कोथमिरे यांनी सादर केलेल्या 'वंदे मातरम' गीताने झाला. संपूर्ण सभागृह देशभक्तीच्या भावनेने भारावून गेले. राष्ट्रभक्ती, सामाजिक ऐक्य आणि सांस्कृतिक जागृतीचा संदेश देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

या विराट हिंदू संमेलनाच्या माध्यमातून सर्व जाती-पातीत विखुरलेला हिंदू समाज एकत्र येऊन राष्ट्रीय मूल्ये व हिंदुत्व जपण्याचा तसेच सामाजिक संघटन मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या सर्व कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमासाठी खूप मेहनत घेतली व मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली.

या कार्यक्रमासाठी हिंदू एकता समितीचे अध्यक्ष सोपानराव देशमुख, उपाध्यक्ष श्रीकांत गोंगे, सचिव गिरीश मालपाणी, रमाकांत वेडे तसेच सदस्य भाऊ जाखडी, डॉ. प्रवीण पानसरे, डॉ. सोमेश वैद्य, इंजि. संजय शिंदे, सीए योगेश झंवर, विनायक अव्वल, जगन्नाथ वामन, अनिता दीदी आणि कमलाकर भालेकर यांनी विशेष परिश्रम घेतले. संमेलनानंतर सर्वांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

# शहीद जवानांच्या मूळ गावी स्मारक उभारण्यासाठी प्रशासन कटिबद्ध - पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे



## शहीद जवानाच्या कुटुंबास एक कोटींची मदत; गुणवंत अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव

अहिल्यानगर (युवावार्ता प्रतिनिधी) - देशाच्या रक्षणासाठी प्राणार्पण करणाऱ्या शहीद जवानांचे केवळ स्मरण न राहता त्यांच्या बलिदानाची स्मृती कायम राहावी, यासाठी त्यांच्या मूळ गावी स्मारके उभारण्याबाबत प्रशासन कटिबद्ध असल्याची ग्वाही जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. महाराष्ट्र दिनानिमित्त जिल्हा प्रशासनाच्यावतीने उत्कृष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान व पुरस्कार सोहळा आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, आमदार अमोल खताळ, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर धनंजय जाधव, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक आदी उपस्थित होते.

जिल्ह्यातील शहीद जवान शिपाई संदीप पांडुरंग गायकर यांच्या पत्नी श्रीमती दिपाली संदीप गायकर यांना राज्य शासनाच्या वतीने एक कोटी रुपयांचा धनादेश पालकमंत्र्यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. यावेळी पालकमंत्र्यांनी शहीद कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करत, प्रशासन व संपूर्ण जिल्हा त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील, असा विश्वास दिला.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले की, उल्लेखनीय कार्यातून अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वतःसह जिल्ह्याचाही लौकिक वाढवला आहे. प्रशासनातील सर्व घटकांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे जिल्ह्याचा नावलौकिक राज्यभर वाढला असून शासनाला या गुणवंत अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सार्थ अभिमान आहे. जिल्ह्याची कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यात पोलीस दलाचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे सांगताना त्यांनी पोलीस अधिकारी व जवानांचे विशेष कौतुक केले. मनुष्यबळाची कमतरता असतानाही संपूर्ण जिल्ह्याच्या सुरक्षेची जबाबदारी सक्षमपणे पार पाडणाऱ्या पोलीस दलाच्या तत्परतेमुळे जिल्हा अधिक सुरक्षित राहिल्याचे त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्र दिनानिमित्त १ मे रोजी पोलीस कवायत मैदानावर हा सत्कार सोहळा आयोजित करण्याचे नियोजन होते. मात्र, कर्तव्यावर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी तसेच पुरस्कारार्थींना योग्य सन्मान मिळावा या उद्देशाने कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कोविड ड्युटी बजावताना मृत्यू झालेल्या ग्रामपंचायत शिपाई कै. शिवाजी भीमाजी गुडेकर यांच्या वारसदार रविंद्र शिवाजी गुडेकर व राजेंद्र शिवाजी गुडेकर यांना ५० लाख रुपयांची मदत यावेळी प्रदान करण्यात आली. विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय दशरथ घोगरे यांना 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कार', पोलीस पाटील दादासाहेब गणपत भोसले यांना 'राज्यपाल विशेष उल्लेखनीय सेवा पुरस्कार' तसेच ग्राम महसूल अधिकारी संगीता मुरलीधर मगर यांचा गौरव करण्यात आला.

महिला व बालविकास विभागाच्या वतीने देण्यात येणारा 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जिल्हास्तरीय पुरस्कार' सावित्रा प्रशांत गायकवाड आणि श्रीमती संगीता अरविंद मालकर यांना प्रदान करण्यात आला. पोलीस व कृषी विभागात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. उत्कृष्ट सेवेबद्दल अप्पर पोलीस अधीक्षक वैभव मनोहर कलुबुर्मे, मुख्तारखान गुलजारखान पठाण, प्रल्हाद भानुदास गिते, नितीन पोपट गांगुर्डे, मनोहर नामदेव शेजवळ, अजय नारायण नगरे, संजय जबाजी खंडागळे, गोविंद दादासाहेब गोल्हार, राजू आप्पासाहेब सद्रिक, राजेंद्र केशव पाटोळे, सुनील बबनराव नेहूल आणि प्रविण पुंडलिक साळुंखे यांना 'पोलीस महासंचालक पदका'ने गौरविण्यात आले.

तसेच कृषी विभागाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवल्याबद्दल सहाय्यक कृषी अधिकारी किरण सुदाम घोडके, उपकृषी अधिकारी विजय राजाराम केदारे, मंडळ कृषी अधिकारी किरण हनुमंत उगले, तालुका कृषी अधिकारी अशोक रुपचंद वाळके आणि उपविभागीय कृषी अधिकारी अक्षय महादेव गोसावी यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मा.मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या पाठपुराव्यातून वडगाव पान साठवण तलावात पाणी - कांदळकर

**दीड वर्षानंतर तळेगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे पाणी आल्याने नागरिकांमध्ये आनंद**

संगमनेर (प्रतिनिधी) - मा. मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या तळेगाव सह १६ गावांसाठी असलेली प्रादेशिक पाणीपुरवठा योजना मागील दीड वर्षापासून बंद होती. लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या पाठपुराव्यातून निंबाळे शिवारातून प्रवरा नदीकाठी पंपिंग स्टेशन मधून वडगाव पान येथील साठवण तलाव्यात दीड वर्षानंतर पाणी दाखल झाल्याने लाभार्थी १६ गावांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे असे प्रभाकर कांदळकर यांनी म्हटले आहे.

वडगाव पान साठवण तलाव येथे तळेगाव भागातील विविध कार्यकर्त्यांनी या पाण्याचे जल पूजन करत आनंदोत्सव साजरा केला. यावेळी पाणीपुरवठा समितीचे माजी अध्यक्ष प्रभाकर कांदळकर, शेतकी संघाचे संचालक सचिन दिघे, माजी उपसभापती बाळासाहेब गायकवाड,तिगाव सरपंच डी के सानप, वडझरीचे डॉ संदीप गोर्डे, सचिन गोर्डे, प्रकाश गोर्डे, संजय दिघे, वडझरी खु चे सरपंच पांडुरंग सुपेकर किशोर सुपेकर, रामदास भागवत, बाळासाहेब दिघे, माळेगाव सरपंच रावसाहेब जंबुकर, सखाराम थोरात ,नानासाहेब कुळधरण, विलास थोरात सह विविध कार्यकर्ते उपस्थित होते.

मागील दीड वर्षापासून तांत्रिक अडचणी,जलजीवन मिशनची कामे व इतर कारणांमुळे ही योजना पूर्णपणे बंद होती. कोल्हेवाडी परिसरातील काही विरोधी कार्यकर्त्यांनी मोठ्या अडचणी निर्माण केल्या होत्या. सध्या उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. तळेगाव भागामध्ये पशुधन मोठ्या प्रमाणात आहे नागरिकांना व जनावरांचा पिण्याचा पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. विविध गावांमधून नागरिकांची पाण्यासाठी वन-वन होत आहे. तळेगाव सह विविध गावांमधील नागरिकांनी लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्याकडे पाठपुरावा केला. यापूर्वीही ज्या ज्या वेळी अडचणी आल्या त्या त्या वेळी लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी कारखान्याची यंत्रणा वापरून अगदी देवकवठ्याच्या टोकापर्यंत पाणी दिले हे सातत्य मागील १५ वर्षे कायम होते. अडचणी येत होत्या मात्र त्या सोडवल्या जायच्या. मात्र सध्याचे सत्ताधारी हे पाण्याचेही राजकारण करत असून जनतेच्या लक्षात आल्यानंतर जनतेने पुन्हा लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्याकडे मागणी केल्यानंतर त्यांनी तातडीने कोल्हेवाडी मधील



अडचणी दुरुस्ती करत व वरिष्ठ पातळीवर बोलून सदर योजने कार्यान्वित करण्यासाठी लक्ष घातले असे प्रभाकर कांदळकर यांनी सांगितले आहे.

यामुळे १७ महिन्यानंतर हे पाणी तळेगावच्या साठवण तलावात दाखल झाले आहे. त्यामुळे तळेगाव तीगाव, करुले, निळवंडे, चिंचोली गुरव, काकडवाडी, नान्नज दुमाला, वरझडी बुद्रुक, खुद , देवकवठे पारेगाव बुद्रुक यांच्यासह विविध गावांमध्ये योगी नियोजन केले तर हे पाणी मिळणार आहे. हे पाणी साठवण तलावात आल्यानंतर कार्यकर्त्यांसह १६ गावांमधील नागरिकांमध्ये मोठे आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

### लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्यामुळेच योजना कार्यान्वित - सचिन दिघे

१६ गावांचा पाणी प्रश्न कायम सुटावा याकरता लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून अगदी प्रवरानदीवरून देव कवठ्याच्या टोकापर्यंत तळेगाव पाणीपुरवठा योजनेमार्फत पाणी गेले. मात्र मागील दीड वर्षापासून नवीन लोकप्रतिनिधी व पालकमंत्री यांच्या उदासीनतेमुळे ही योजना पूर्णपणे बंद होती. अनेक वेळा विनंत्या केल्या, निवेदने दिली. महायुतीचे कार्यकर्ते मात्र पूर्णपणे गप्प होते. शेवटी लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळेच १७ महिन्याच्या प्रदीर्घ कालावधीनंतर या साठवण तलावात पाणी आले असल्याचे ज्येष्ठ नेते प्रभाकर कांदळकर व युवक कार्यकर्ते सचिन दिघे यांनी म्हटले आहे.

# मातांच्या धाडसापुढे बिबट्याची माघार

**संगमनेर-अकोलेतील दोन थरारक घटनांनी वेधले लक्ष**

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- संगमनेर आणि अकोले तालुक्यात घडलेल्या दोन स्वतंत्र घटनांमध्ये महिलांनी दाखवलेल्या अद्वितीय धाडसामुळे जीव वाचल्याच्या घटना समोर आल्या आहेत. एका ठिकाणी ६५ वर्षीय आईने प्रसंगावधान राखत मुलाचा जीव वाचवला, तर दुसऱ्या ठिकाणी सासू-सुनेने तब्बल अर्धा तास बिबट्याशी झुंज देत नवजात वासराचे प्राण वाचवले. या दोन्ही घटनांमुळे परिसरात महिलांच्या धैर्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.




संगमनेर तालुक्यातील पठार भागातील खरशिंदे गावात गुरुवारी सकाळी हरिभाऊ शिवराम गायकवाड यांच्या दगडी वाड्यात अचानक बिबट्याने प्रवेश केला. त्यावेळी हरिभाऊ यांच्या ६५ वर्षीय आई गंगूबाई या चुलीवर स्वयंपाक करत होत्या, तर हरिभाऊ दरवाजाजवळ झोपलेले होते. अचानक बिबट्या घरात शिरल्याने क्षणभर भीतीचे वातावरण निर्माण झाले. मात्र, गंगूबाई यांनी धीर न सोडता तातडीने आरडाओरडा करत मुलाला बिछान्यासह बाहेर ओढले आणि प्रसंगावधान दाखवत घराच्या दरवाजाला बाहेरून कडी लावली. त्यामुळे बिबट्या घरातच अडकला आणि संभाव्य मोठी दुर्घटना टळली.

घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी आणि रेस्क्यू पथक घटनास्थळी दाखल झाले. बिबट्या घरात इकडून तिकडे उड्या मारत वन कर्मचाऱ्यांना चकवा देत होता. अखेर योग्य संधी साधून त्याला भूल देत सुरक्षितरित्या जेरबंद करण्यात आले.

दुसरी घटना अकोले तालुक्यातील पिंपळगाव निपाणी येथे घडली. १२ मे रोजी मध्यरात्री दोनच्या सुमारास बिबट्याने गोर्डे कुटुंबाच्या गोठ्यात घुसून नवजात वासरावर हल्ला केला. वासराच्या ओरडण्याचा आवाज आणि जनावरांच्या हंबरड्याने मंगल गोर्डे यांना जाग आली. त्यांनी तातडीने सून नीता गोर्डे हिला उठवले.

घरात अवघे काही महिन्यांचे बाळ असतानाही या दोघींनी धैर्य न गमावता थेट गोठ्याकडे धाव घेतली. बिबट्या वासराला फरफटत नेत असल्याचे दिसताच त्यांनी आरडाओरडा करत दरवाजे आणि खिडक्या जोरजोरात वाजवण्यास सुरुवात केली. त्यानंतर मोठे धाडस दाखवत त्या थेट घराबाहेर पडल्या आणि बिबट्याला हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला. जवळपास अर्धा तास सुरू असलेल्या या संघर्षानंतर अखेर बिबट्याने माघार घेत वासरू सोडून जंगलाच्या दिशेने पळ काढला. या घटनेत वासराला किरकोळ दुखापत झाली असून त्याचा जीव वाचला आहे.

संगमनेर आणि अकोले तालुक्यात वाढत्या बिबट्या वावरामुळे ग्रामीण भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले असले, तरी या दोन घटनांनी संकटसमयी महिलांचे धैर्य, प्रसंगावधान आणि कुटुंबावरील माया पुन्हा अधोरेखित केली आहे.

# राजूरमधील पिंपरकणे ग्रामपंचायतीला महिलांनी ठोकले टाळे

राजूर : पाणीटंचाईमुळे हैराण झालेल्या अकोले तालुक्यातील पिंपरकणे येथील ग्रामपंचायत कार्यालयास तळेवाडीच्या संतप्त महिलांनी शुक्रवारी टाळे ठोकले. यावेळी ग्रामसेवक, सरपंच आणि सदस्य यांना ग्रामपंचायत कार्यालयात कोंडले. पाणी देण्याचे आश्वासन दिल्यानंतर सर्वांची सुटका करण्यात आली.

निळवंडे जलाशयाच्या काठावर आढळवाडी, डोंगरवाडी, तळेवाडी अशा तीन वाडीवस्त्यांसह पिंपरकणे गाव आहे. त्यापैकी तळेवाडी येथील नागरिकांना गेल्या अनेक वर्षांपासून तीव्र पाणीटंचाईच्या झळ सोसाव्या लागत आहेत. शाश्वत पाण्याची कोणतीही सोय नसल्यामुळे येथील महिलांवर पाण्यासाठी पायपीट करण्याची वेळ आली आहे.

पाणी समस्येबाबत ग्रामस्थांनी वारंवार प्रशासनाला निवेदने, अर्ज, विनंत्या करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने

पाणीटंचाईमुळे संतप्त झालेल्या तळेवाडीच्या महिलांनी शुक्रवारी पिंपरकणे ग्रामपंचायत कार्यालयास टाळे लावून आंदोलन केले.

ग्रामपंचायत प्रशासनाने तळेवाडीला पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



## पानोडीत विहिरीत पडलेल्या बिबट्याला जीवदान

### वनविभागाची थरारक रेस्क्यू मोहीम फत्ते!





शिबलापूर (युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर तालुक्यातील पानोडी येथील चव्हाण वस्तीवर एका विहिरीत पडलेल्या बिबट्याला वनविभागाच्या पथकाने अथक परिश्रमानंतर सुखरूप बाहेर काढले. या थरारक रेस्क्यू ऑपरेशनमुळे बिबट्याला जेरबंद करण्यात यश आले असून, गेल्या काही दिवसांपासून दहशतीत असलेल्या ग्रामस्थांनी अखेर सुटकेचा निश्वास सोडला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या तीन दिवसांपासून चक्रीवादळामुळे परिसरात वीज पुरवठा खंडित झाला आहे. त्यामुळे साकूर रस्त्यावरील कारभारी तुकाराम चव्हाण यांच्या विहिरीवरील विद्युत पंप बंद होता. बुधवारी घरातील पाण्यासाठी अनिकेत शिवाजी चव्हाण आणि त्यांची आई विहिरीवर पाणी भरण्यासाठी गेले होते. विहिरीत डोकावून पाहिले असता, त्यांना आत बिबट्या पडल्याचे निदर्शनास आले. बिबट्याला पाहताच, त्यांनी क्षणाचाही विलंब न करता ही माहिती संकेत तांबे आणि पत्रकार राजेश गायकवाड यांना दिली.

पत्रकार राजेश गायकवाड आणि संकेत तांबे यांनी तातडीने वनविभागाशी संपर्क साधून घटनेचे गांभीर्य लक्षात आणून दिले. माहिती मिळताच, वनविभागाचे पथक अवघ्या काही वेळातच घटनास्थळी दाखल झाले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने आणि वनविभागाच्या नियोजनामुळे, अवघ्या दीड तासांच्या थरारक मोहिमेनंतर बिबट्याला पिंजऱ्यात जेरबंद करण्यात आले.

या घटनेची माहिती मिळताच, वन परिक्षेत्र अधिकारी सुभाष सांगळे, वन मंडल अधिकारी भाऊसाहेब बोकडे, वनरक्षक रामेश्वर मडपे, रेस्क्यू टीम प्रमुख संतोष पारखे, वनरक्षक पवार, धानापुणे, साळवे, कर्मचारी पोपट गागरे, नजीर शेख, उत्तम भूसारी, गोविंद भूसारी, संजय गागरे, रामदास वर्पे यांनी पथकासह तातडीने चव्हाण यांच्या वस्तीवर धाव घेतली.

या मोहिमेत संतोष चव्हाण, महेमुद सय्यद, संकेत तांबे, राजेश गायकवाड यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. वनविभागाने दाखवलेल्या तत्परतेबद्दल आणि बिबट्याला जेरबंद केल्याबद्दल, पानोडी ग्रामस्थांनी वनविभागाच्या पथकाचे आभार मानले आहेत. जेरबंद केलेल्या बिबट्याला पुढील प्रक्रियेसाठी नैसर्गिक अधिवासात सोडण्यात येणार असल्याचे वनविभागाकडून सांगण्यात आले.

## मोमेबल आयव्हीएफ सेंटरतर्फे संगमनेरमध्ये 'एका आईची गोष्ट' अभियानाचा शुभारंभ

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर येथील मोमेबल आयव्हीएफ सेंटरमध्ये मदर्स डे निमित्त १२ मे रोजी 'एका आईची गोष्ट' या सामाजिक जनजागृती अभियानाचे औपचारिक प्रक्षेपण करण्यात आले. ग्रामीण भागात आयव्हीएफ, वंध्यत्व उपचार आणि प्रजनन आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी हे अभियान वर्षभर राबविण्यात येणार आहे.

कार्यक्रमाला मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह, माध्यम प्रतिनिधी तसेच मोमेबल मित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामीण भागात मोमेबलचे कार्य पोहोचवण्यासाठी योगदान देणाऱ्या मोमेबल मित्र यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी गगन राऊत, मोहन आंबरे, सीमा हासे, धनंजय बोराडे, सोनाली खतोडे, अभिजीत खरात, तनुजा गाडेकर उपस्थित होते.

ग्रामीण भागात आजही आयव्हीएफ आणि वंध्यत्व उपचारांबाबत अनेक गैरसमज असल्याने अनेक जोडपी

उपचारांपासून दूर राहतात. हे गैरसमज दूर करून योग्य माहिती लोकांपर्यंत पोहोचवणे, हा अभियानाचा मुख्य उद्देश आहे. आयव्हीएफ प्रक्रियेत वापरले जाणारे



अंडाणू आणि शुक्राणू संबंधित जोडप्याचेच असतात, आयव्हीएफमधून जन्माला येणारी बाळे पूर्णतः निरोगी असतात, तसेच आयव्हीएफ ही आधुनिक वैद्यकीय विज्ञानाने दिलेली आशेची संधी आहे, याविषयी जनजागृती केली जाणार आहे.

या उपक्रमांतर्गत ग्रामीण भागात मोफत सोनोग्राफी, वीर्य विश्लेषण, स्त्रीबीज क्षमतेची तपासणी, वंध्यत्व समुपदेशन आणि प्रजनन आरोग्य

मार्गदर्शन शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. तसेच नवीन पिढीमध्ये गर्भधारणा नियोजन, प्रजनन क्षमता जागरूकता आणि प्रजनन आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यावर भर दिला जाणार आहे. मोमेबल आयव्हीएफ सेंटरच्या संस्थापक व संचालिका डॉ. एकता वाबळे यांनी सांगितले की, एका आईची गोष्ट हे अभियान संपूर्ण महाराष्ट्रभर पोहोचवण्याचा प्रयत्न राहील. वंध्यत्वाबाबतचा समज-गैरसमज दूर करून प्रत्येक जोडप्याला योग्य माहिती, उपचार आणि भावनिक आधार देणे, हीच या अभियानामागील प्रेरणा असल्याचे त्यांनी नमूद केले.

## राज्यात २४ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

मुंबई (युवावार्ता प्रतिनिधी)-

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य प्रशासनाप्रमाणेच आता पोलीस दलातही मोठ्या प्रमाणात फेरबदल करण्याचा निर्णय घेतला असून, शुक्रवारी त्यांनी गृह विभाग अंतर्गत पोलीस प्रशासनात मोठ्या प्रमाणात फेरबदल केले. मुख्यमंत्र्यांनी अप्पर पोलीस महासंचालक श्रेणीतील अनेक अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश दिले आहेत. त्यामुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे. गृह विभागाने पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश निर्गमित केले असून, त्यांना तातडीने बदलीच्या ठिकाणी रुजू होण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

आज ज्या पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत, त्यामध्ये अपर पोलीस महासंचालक श्रेणीतील पदावर पदोन्नती आणि बदली झालेल्या अधिकाऱ्यांमध्ये कृष्ण प्रकाश - अपर पोलीस महासंचालक, फोर्स वन यांची अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण) येथे, दत्ता कराळे - विशेष पोलीस महानिरीक्षक,




नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य मानवी हक्क आयोग येथे बदली करण्यात आली आहे.

विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण प्रविण पडवळ यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र येथे, लखमी गौतम (पोलीस सह आयुक्त (गुन्हे), बृहन्मुंबई) यांची विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था), मुंबई, मनोज शर्मा यांची पोलीस सह आयुक्त (कायदा व सुव्यवस्था), बृहन्मुंबई, सुवेझ हक यांची पोलीस सह आयुक्त (प्रशासन), महेश पाटील यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय) येथे पदोन्नतीने बदली करण्यात आली आहे. परमजीत दहिया यांची दहशतवाद विरोधी पथक (पदोन्नतीने) विशेष पोलीस महानिरीक्षकपदी, सी. के. मीना यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, संजय दराडे यांची पोलीस सह आयुक्त, पुणे, रंजन शर्मा यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, तर सुनिल फुलारी यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग (पूर्व), राजेश प्रधान यांची पोलीस सह आयुक्त, आर्थिक गुन्हे, निशिथ मिश्रा यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण, जय कुमार यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, फोर्स वन, संजय येनपुरे यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, व्ही. आय. पी. सुरक्षा, संजय जाधव यांची अपर पोलीस आयुक्त, ठाणे, दिपक साकोरे यांची पोलीस सह आयुक्त, नवी मुंबई, पंजाबराव उगले यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस गृह निर्माण महामंडळ आणि एस. व्ही. पाठक यांची विशेष पोलीस महानिरीक्षक (आर्थिक गुन्हे), गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे येथे बदली करण्यात आली आहे.

तसेच, विनायक देशमुख यांची नियंत्रक, वैधमापन, ज्योती प्रिया सिंग यांची विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी पथक, अनिल कुंभारे यांची पोलीस सह आयुक्त (गुन्हे), मुंबई, सत्य नारायण चौधरी यांची पोलीस सह आयुक्त, वाहतूक, येथे नियुक्ती करण्यात आली आहे. आली आहे.

## अभिनेत्री उषा चव्हाण पुरस्कार परत करणार

मुंबई (प्रतिनिधी)-

ज्येष्ठ मराठी चित्रपट अभिनेत्री उषा चव्हाण यांच्या कुटुंबाच्या मालकीच्या जमिनीवरील विकास हक्क हस्तांतर अधिकार पुणे महापालिकेने अन्य एका खासगी विकासकाला दिल्याने व्यथित झालेल्या उषा चव्हाण या, त्यांना सरकारकडून देण्यात आलेला जीवन गौरव पुरस्कार येत्या रविवारी (ता. १७)



ठाणे येथील आनंदआश्रम येथे आनंद दिघे यांच्या स्मृतिस्थळावर अर्पण करणार आहेत.

यासंदर्भात उच्च न्यायालयाच्या आदेशात उषा चव्हाण यांचा मुलगा हृदयनाथ दत्तात्रेय कडू यांचा मालक म्हणून स्पष्ट उल्लेख आहे. या मालमत्तेची वाटणी झालेली नसताना देखील, चव्हाण कुटुंबाचे मालकी हक्क डावलून संपूर्ण टी. डी. आर. विकासकाच्या घशात घालण्यात आल्याचा उषा चव्हाण यांचा आरोप आहे.

## बोगस बियाणे, खतांचा काळाबाजार

### पीक विमा कंपन्यांच्या दिरंगाईवर फौजदारी गुन्हे दाखल करा - पालकमंत्री

अहिल्यानगर (जिल्हा माहिती कार्यालय)-

बोगस बियाणे व खत विक्रेत्यांवर केवळ परवाने निलंबित करण्याची औपचारिक कारवाई न करता थेट फौजदारी गुन्हे दाखल करावेत, खतांचा काळाबाजार, सक्तीची जोडविक्री व निर्धारित दरापेक्षा जास्त दराने विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच शेतकऱ्यांना वेठीस धरणाऱ्या पीक विमा कंपन्यांवरही गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशा सूचना जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज येथे दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित खरीप हंगामपूर्व नियोजन बैठकीत पालकमंत्री डॉ. विखे पाटील बोलत होते. यावेळी आमदार अमोल खताळ, आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, आमदार विक्रमसिंह पाचपुते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, आत्माचे प्रकल्प संचालक प्रदीप लाटे, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे संचालक डॉ.जी.के.ससाणे, डॉ.प्रशांत बोडके, दूरदृश्य प्रणालीद्वारे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार हेमंत ओगले, आमदार किरण लहामटे, उपविभागीय महसूल, कृषी अधिकारी, तहसीलदार , तालुका कृषी अधिकारी आदी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले , खरीप हंगामात खतांची कृत्रिम टंचाई निर्माण होणार नाही, यासाठी प्रशासनाने काटेकोर नियोजन करावे. जिल्ह्यात खतांचा पुरेसा



राखीव साठा उपलब्ध ठेवण्यात आला असून, पारंपरिक युरिया व डीएपीला प्रभावी पर्याय म्हणून 'नॅनो युरिया' व 'नॅनो डीएपी'च्या वापरास प्रोत्साहन द्यावे. खत खरेदी-विक्री प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी खतांच्या पिशव्यांवरील 'क्यूआर' प्रणाली व इलेक्ट्रॉनिक विक्री यंत्रणा प्रभावीपणे राबवावी. सर्व कृषी सेवा केंद्रांवर खतांचे दर व उपलब्ध साठा दर्शविणारे फलक लावणे बंधनकारक करण्यात यावे, असे निर्देश त्यांनी दिले.

सेंद्रिय व नैसर्गिक शेतीला चालना देण्यासाठी कृषी विज्ञान केंद्रांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात यावे. उत्कृष्ट व नाविन्यपूर्ण काम करणाऱ्या शेतकऱ्यांना जिल्हा परिषदेमार्फत विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करावे, जेणेकरून नैसर्गिक शेतीकडे इतर शेतकरी प्रेरित होतील, असे त्यांनी सांगितले.

शेतमजुरांच्या उपलब्धतेचा आढावा घेऊन नोंदणीकृत मजुरांना प्रत्यक्ष शेतीच्या कामात सहभागी करून घ्यावे. निष्क्रिय मजुरांबाबत आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करून शेतीची कामे वेळेत पूर्ण होतील, याची दक्षता घ्यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

शेतकऱ्यांपर्यंत कृषी विभागाच्या योजना, हवामान अंदाज व आधुनिक तंत्रज्ञान पोहोचवण्यासाठी गावपातळीवर व्हॉट्सप गट तयार करावेत. शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी गट व 'शेतकरी शास्त्रज्ञ मंच'च्या माध्यमातून कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यात यावा, असेही त्यांनी सांगितले.

राज्याबाहेरून, विशेषतः सीमावर्ती भागांतून येणाऱ्या बोगस बियाण्यांच्या विक्रीला आळा घालण्यासाठी पोलिसांच्या मदतीने तपासणी नाके उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कापूस, सोयाबीन व रब्बी ज्वारीच्या बियाण्यांमध्ये झालेल्या फसवणुकीची गंभीर दखल घेत अनधिकृत विक्रेत्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

खरेदी केलेल्या खतांच्या वाहतुकीसाठी शेतकऱ्यांकडून जादा भाडे आकारले जात असल्याच्या तक्रारींची दखल घेत 'राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स' कंपनीकडून १०० किलोमीटरपर्यंत उपलब्ध असलेल्या मोफत वाहतूक सुविधेचा लाभ शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी कृषी अधिकाऱ्यांनी वैयक्तिक लक्ष घालावे, असे निर्देशही यावेळी देण्यात आले.

प्रास्ताविकात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी सांगितले की, जिल्ह्यात खते व बियाण्यांची कृत्रिम टंचाई तसेच गैरप्रकार रोखण्यासाठी गुणवत्ता नियंत्रणावर विशेष भर देण्यात आला आहे. आतापर्यंत ११ हजार तपासण्या पूर्ण करून १०३ कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तसेच, शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांविरोधात २ पोलीस केसेस व १९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

जागतिक परिस्थितीमुळे युरिया व डीएपी खतांचा संभाव्य तुटवडा लक्षात घेऊन ५ हजार ४०० मेट्रिक टन खताचा राखीव साठा निर्माण करण्यात आला असून, त्यापैकी ७५० मेट्रिक टन साठा सध्या उपलब्ध आहे. अल-निनोच्या पार्श्वभूमीवर कमी पावसाचा अंदाज लक्षात घेऊन कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांबाबत विशेष जनजागृती करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

केंद्र व राज्य शासनाच्या विविध कृषी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत अहिल्यानगर जिल्ह्याने राज्यात आघाडी घेतली असून, पीएमएफएमई योजनेत सलग दोन वर्षे जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर राहिला आहे. कृषी यांत्रिकीकरणात एक लाखांहून अधिक शेतकऱ्यांना लाभ देणारा हा राज्यातील एकमेव जिल्हा ठरला आहे. 'महा-विस्तार' पवर ३ लाखांहून अधिक शेतकऱ्यांची नोंदणी झाली असून, जिल्ह्यात १२ हजार ५०० एकर क्षेत्रावर नैसर्गिक शेतीचे प्रयोग सुरू असल्याची माहितीही डॉ. आशिया यांनी दिली. बैठकीत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी सादरीकरण केले. यावेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते कृषी विभागाच्या विविध योजनांच्या माहितीपुस्तिकेचे व संतुलित खत वापर जागरूकता अभियान पोस्टरचे प्रकाशन करण्यात आले.

## वडगावपान साठवण तलावात पाणी

### महायुतीच्या कार्यकर्त्यांकडून जलपूजन

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

निंबाळे येथील प्रवरा नदीवरून वडगाव पान साठवण तलावापर्यंत पाणी येणाऱ्या पाईपलाईनचे काम पूर्ण झाले असून, ते पाणी वडगाव पान साठवण तलावामध्ये दाखल होताच वडगाव पान, निळवंडे, करुले व तळेगाव परिसरातील महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा करत साडी-चोळी अर्पण करून जलपूजन केले.

तळेगावसह २१ गावांना पाणी पुरवठा करणारी तळेगाव प्रादेशिक पाणीपुरवठा करणाऱ्या योजनेची पाईपलाईन नादुरुस्त झाली होती. त्यामुळे वडगाव पान, निळवंडे, करुले, तळेगाव दिघे, तिगाव, माळेगाव हवेली तसेच परिसरातील २१ गावांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत होता. या गंभीर प्रश्नाची दखल घेत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार अमोल खताळ पाटील यांनी जीवन प्राधिकरण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना नादुरुस्त पाईपलाईनचे काम पूर्ण करण्याबाबतच्या सूचना दिल्या. त्यानंतरच खऱ्या अर्थाने या योजनेच्या कामाला गती मिळाली. या पाईपलाईनचे काम पूर्ण झाल्यानंतर या योजनेचे पाणी वडगाव पानच्या साठवण तलावात दाखल झाले. या पाण्याचे महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जलपूजन केले आहे. वडगाव पान साठवण तलावात पाणी आल्यामुळे परिसरातील ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

निंबाळे येथील प्रवरा नदीवरून पाणी उचलून ते नव्याने टाकण्यात आलेल्या पाईपलाईनद्वारे वडगाव पान येथील साठवण तलावात आले असून, परिसरातील नागरिकांना आता शुद्ध व नियमित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. योजनेच्या पुनरुज्जीवनामुळे हजारोवरील गावातील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणार असल्याची भावना वडगाव पानचे सरपंच श्रीनाथ थोरात, निळवंडे उपसरपंच भाऊसाहेब आहेर, शिवसेना वैद्यकीय सेनेचे



जिल्हाप्रमुख संतोष डांगे, तळेगावचे उपसरपंच मयूर दिघे, दत्तात्रय दिघे, निखिल सानप यांच्यासह परिसरातील ग्रामस्थांनी व्यक्त करत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार अमोल खताळ पाटील यांना धन्यवाद दिले आहेत.

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला पाणीप्रश्न सोडवून जनतेला दिलासा देण्याचे काम महायुती सरकारने केले आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, भविष्यात पाणी टंचाईची समस्या कमी होईल, असा विश्वास तळेगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेवर अवलंबून असणाऱ्या २१ गावांतील नागरिकांनी व्यक्त केला आहे.

तळेगाव पाणीपुरवठा योजना अखेर सुरळीत सुरू करण्यात आली असून, यासाठी जलसंपदा वक्ते पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार अमोल खताळ यांच्या सूचनेनुसार जीवन प्राधिकरण विभागाने या योजनेच्या पाईपलाईनचे नादुरुस्त झालेले काम पूर्ण केले. वडगाव पान साठवण तलावात पाणी आले असून, मात्र काही जणांकडून या कामाचे फुकट श्रेय घेण्याचा केविलवाणा प्रयत्न सुरू आहे.


श्रीनाथ थोरात, सरपंच, वडगाव पान

## संपादकीय...

# इंधनदरवाढीचे चटके

देशात पेट्रोल आणि डिझेलच्या दरांमध्ये पुन्हा झालेल्या वाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांच्या आर्थिक गणितावर मोठा परिणाम होताना दिसत आहे. आधीच महागाई, वाढती घरगुती खर्चाची जबाबदारी, शिक्षण, आरोग्य आणि दैनंदिन गरजांच्या वाढलेल्या किंमतींमुळे सामान्य माणूस आर्थिक तणावाखाली असताना इंधनदरवाढीने त्याच्या अडचणीत आणखी भर घातली आहे. पेट्रोल आणि डिझेल हे केवळ वाहन चालवण्यासाठी वापरले जाणारे इंधन नसून संपूर्ण अर्थव्यवस्थेचे रक्तवाहिनीसारखे काम करणारे घटक आहेत. इंधनाचे दर वाढले की त्याचा परिणाम केवळ वाहनधारकांपुरता मर्यादित राहत नाही, तर शेतीपासून उद्योगांपर्यंत आणि भाजीपाला ते प्रवासी वाहतुकीपर्यंत प्रत्येक क्षेत्रावर त्याचे पडसाद उमटतात. शहरांमध्ये नोकरीसाठी किंवा व्यवसायासाठी दररोज प्रवास करणाऱ्या लाखो नागरिकांच्या खिशावर या वाढीचा थेट ताण येत आहे. दुचाकीवर अवलंबून असलेला मध्यमवर्गीय कर्मचारी, रिक्षाचालक, टॅक्सीचालक, डिलिव्हरी सेवा देणारे युवक आणि छोट्या व्यापाऱ्यांना रोजच्या उत्पन्नातून अधिक रक्कम इंधनासाठी खर्च करावी लागत आहे. अनेक कुटुंबांनी आता घरखर्चाचे नियोजन बदलण्यास सुरुवात केली असून अनावश्यक प्रवास टाळणे, मनोरंजन खर्च कमी करणे आणि बचतीवर नियंत्रण ठेवणे अशी वेळ त्यांच्यावर आली आहे. ग्रामीण भागातही परिस्थिती फार वेगळी नाही. शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या पंप, ट्रॅक्टर आणि वाहतूक साधनांवर होणारा अतिरिक्त खर्च शेती उत्पादनाच्या खर्चात वाढ करत आहे. परिणामी कृषी मालाच्या किंमती वाढण्याची शक्यता निर्माण होते आणि त्याचा परिणाम पुन्हा ग्राहकांवरच होतो. मालवाहतुकीचा खर्च वाढल्यामुळे बाजारातील वस्तूंच्या किंमती वाढतात. दूध, भाजीपाला, धान्य, बांधकाम साहित्य, किराणा आणि औद्योगिक वस्तूंच्या वाहतुकीवर इंधनाचा मोठा प्रभाव असल्याने प्रत्येक वस्तूच्या अंतिम किंमतीत वाढ दिसू लागते. अशा परिस्थितीत महागाईचे चक्र अधिक वेगाने फिरू लागते आणि त्याचा सर्वाधिक फटका मर्यादित उत्पन्न असलेल्या कुटुंबांना बसतो. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवरही या दरवाढीचा परिणाम होतो. बससेवा, खासगी प्रवासी वाहतूक, शालेय बस आणि मालवाहतूक क्षेत्रातील खर्च वाढल्याने भाडेवाढीची शक्यता निर्माण होते. यामुळे विद्यार्थ्यांपासून कामगारांपर्यंत सर्व घटकांच्या खर्चात वाढ होते. अनेक छोट्या उद्योगांनाही वाढत्या वाहतूक खर्चामुळे उत्पादन खर्च नियंत्रित ठेवणे कठीण जात आहे. काही उद्योगांमध्ये नफा कमी होत असल्याने रोजगारनिर्मितीवरही अप्रत्यक्ष परिणाम होऊ शकतो. इंधनदरवाढीचा मानसिक परिणामही तितकाच गंभीर असतो. बाजारात दर वाढण्याची भीती निर्माण होताच नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढते. भविष्यात आणखी महागाई वाढेल या चिंतेमुळे ग्राहक खर्चावर नियंत्रण ठेवतात, ज्याचा परिणाम बाजारातील मागणीवर होतो. सण-उत्सव, पर्यटन, छोट्या खरेदी आणि स्थानिक व्यवसायांवर याचा नकारात्मक परिणाम जाणवू लागतो. अनेक युवक आता वैयक्तिक वाहनाऐवजी सामायिक प्रवास, सार्वजनिक वाहतूक किंवा इलेक्ट्रिक वाहनांचा पर्याय शोधू लागले आहेत. ही बदलती मानसिकता भविष्यात ऊर्जा वापराच्या सवयींमध्ये मोठा बदल घडवू शकते. जगभरातील कच्च्या तेलाच्या किंमतीतील चढ-उतार, आंतरराष्ट्रीय तणाव, चलनमूल्यातील बदल आणि जागतिक आर्थिक परिस्थिती यांचा इंधनदरांवर थेट प्रभाव पडत असतो. त्यामुळे इंधनदरांचा प्रश्न हा केवळ एका दिवसाचा किंवा एका क्षेत्रापुरता मर्यादित नसून व्यापक आर्थिक वास्तवाशी जोडलेला विषय आहे. अशा परिस्थितीत ऊर्जा बचत, सार्वजनिक वाहतुकीचा अधिक वापर, पर्यायी ऊर्जास्रोतांचा विकास आणि स्थानिक पातळीवर सक्षम वाहतूक व्यवस्था उभारणे ही काळाची गरज बनली आहे. नागरिकांनीही शक्य तिथे इंधनाचा संयमी वापर करणे, अनावश्यक प्रवास टाळणे आणि पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारणे आवश्यक ठरत आहे. वाढत्या इंधनदरांच्या पार्श्वभूमीवर सामान्य माणसाचे जीवन अधिक कसरतीचे बनत असले तरी बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी समाज आणि व्यवस्था या दोघांनीही दीर्घकालीन उपायांचा विचार करणे अत्यंत आवश्यक झाले आहे.


युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता



**पाहिजेत**

अकाऊंटंट | जागा ०२

टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे

आकर्षक पगार व इतर सुविधा

बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com

वाटचाल तीन दशकांची


# जिल्ह्यात मतदारयाद्यांचा विशेष सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रम जाहीर

(जिल्हा माहिती कार्यालय)

अहिल्यानगर - भारत निवडणूक आयोगाने १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनावर आधारित मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. या सखोल पुनरीक्षण कार्यक्रमास सर्व राजकीय पक्ष तसेच मतदारांनी आवश्यक ते सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले आहे.



या कार्यक्रमानुसार ३० जून २०२६ ते २९ जूलै २०२६ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घरोघरी भेट देऊन प्रगणना फॉर्म वाटप करणार आहेत. हे फॉर्म प्रत्येक मतदाराला दोन प्रतीत दिले जातील. मतदारांनी दोन्ही फॉर्म पूर्णपणे भरून अधिकाऱ्याकडे जमा करावेत व एका प्रतीवर पोहोच घेणे आवश्यक आहे. प्रगणना फॉर्म ऑनलाईन पद्धतीने भरून देण्याचीही सुविधा उपलब्ध असणार आहे. मतदारांचे सन २००२ च्या मतदारयादीशी मॅपिंग झाले असले तरीही सर्वांनी फॉर्म भरून देणे आवश्यक आहे. फॉर्म भरून न दिलेल्या मतदारांची नावे प्रारूप मतदार यादीमध्ये समाविष्ट होणार नाहीत.

ज्या मतदारांचे प्रगणना फॉर्म प्राप्त होतील त्यांची प्रारूप मतदार यादी ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल.

प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर ५ ऑगस्ट २०२६ ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत यादीबाबत काही हरकती व दावे असल्यास नियमानुसार दाखल करता येतील. तसेच ५ ऑगस्ट २०२६ ते ३ ऑक्टोबर २०२६ या दरम्यान प्रारूप मतदार यादीमध्ये समाविष्ट असणारे परंतु २००२ च्या यादीशी मॅपिंग न झालेले किंवा अचूक मॅपिंग न झालेले मतदार यांची मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयाकडून सुनावणी घेतली जाईल. सुनावणीवेळी मतदारांनी आपला रहिवास व जन्माचा पुरावा दाखल केल्यावर त्यांची नावे अंतिम यादीत समाविष्ट होतील.

प्रारूप मतदार यादीवर दाखल झालेले हरकती व दावे निर्गत करून ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने १४ मे २०२६ रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. उपस्थित प्रतिनिधींना कार्यक्रमाची सविस्तर माहिती देऊन त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. सर्व राजकीय पक्षांनी प्रत्येक यादी भागाकरिता एक मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी नियुक्त करण्याचे आवाहन करण्यात आले असून नियुक्त प्रतिनिधींना मतदार नोंदणी अधिकारी स्तरावर प्रशिक्षण दिले जाईल.

# लव शिंदे यांचे निधन

श्रीरामपूर (युवावार्ता प्रतिनिधी)-



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत सेवा भारती कार्यकारिणी सदस्य व अशोक सहकारी साखर कारखान्याचे पर्सोनल मॅनेजर, ज्येष्ठ पत्रकार लव शंकरराव शिंदे (वय ६०) यांचे हृदयविकाराने निधन झाले.

दैनिक सार्वमत व नगर तरुण भारतमध्ये त्यांनी पत्रकारिता केली. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, बहीण, चार बंधू, भावजयी, पुतणे असा परिवार आहे. अंकुश, संतोष, कैलास व विलास शिंदे यांचे ते बंधू होत.

# कुंभमेळा रिंगरोडमुळे अशोक खरातला कोटींचा मोबदला

नाशिक (प्रतिनिधी)-



नाशिकमध्ये महिलांची फसवणूक आणि अत्याचार प्रकरणात अटकेत असलेला भोंदूबाबा अशोक खरात पुन्हा चर्चेत आला आहे. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी उभारण्यात येणाऱ्या रिंग रोड प्रकल्पासाठी खरात आणि त्याच्या कुटुंबीयांच्या जमिनी संपादित करण्यात येत असून, त्याबदल्यात तीन कोटी रुपयांहून अधिक मोबदला मिळणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गवळणे शिवारातील जमिनीबदल्यात अशोक खरात आणि पत्नी कल्पना खरात यांना सुमारे ८२ लाख रुपये, तर पाथर्डी शिवारातील जमिनींसाठी मुली तृप्तबाला आणि सृष्टी खरात यांना जवळपास १.८२ कोटी रुपयांची भरपाई मिळणार आहे.

या प्रकरणात निलंबित उपजिल्हाधिकारी अभिजित भांडे पाटील यांच्या पत्नीचे नावही समोर आल्याने चर्चांना उधाण आले आहे.


**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME
SHAIKH RAIS AHMED HUSEN
TO NEW NAME AS
RAIS HUSAIN SHAIKH
R/O. GALANDE MALA, BHARAT NAGAR, SANGAMNER, DIST - AHILYANAGAR-422605

**जन्म तारीख बदल**

मी विशाल मच्छिंद्र सहाणे रा. पिंपळगाव निपाणी, ता. अकोले जि. अहिल्यानगर असे स्पष्ट करतो की, माझी जन्म दाखल्यावर जन्म तारिख २१/०५/१९९८ अशी आहे. मात्र आधारकार्ड व पॅनकार्डवर नजरचुकीने २१/०५/१९९७ अशी झाली आहे.तरी जन्मदाखल्याप्रमाणे माझी जन्मतारीख २१/०५/१९९८ हिच ग्राह्य धरावी.

**पाहिजेत**

आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**अंक वितरणासाठी मुले पाहिजेत**

9822039460
7620388230


जनसेवा हिच ईश्वर सेवा

## संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

दुरध्वनी – (०२४२५–२२५३०८/२२५१६५), फॅक्स – २२५९६३
ई–मेल – cosangamner@gmail.com

संनपा/बांध/१४/१३६६२०२६ दिनांक १५/०५/२०२६

### जाहीर नोटीस

( महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व ओद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १९५ व २९९ अन्वये )

संगमनेर नगरपरिषद हददीतील तमाम इमारत मालक, भोगवटादार, भाडेकरी यांना महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १९५ व २९९ अन्वये कळविणेत येते की,

अवकाळी पाऊस, पडण्यास सुरुवात झालेली असून लवकरच पावसाळा देखील सुरु होत आहे. पाउस तसेच वादळ वाऱ्यामुळे जुन्या जीर्ण इमारती, वाडे इत्यादी अचानक कोसळून जीवित अगर वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब नगरपरिषद हद्दीत असलेल्या अश्या सर्व जुन्या जीर्ण मालमत्ता इमारतीचे मालक भाडेकरू भोगवटादार यांना उक्त नमूद अधिनियमातील तरतुदीनुसार या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की वादळ पावसामुळे इमारती अश्या सर्व जुन्या / जीर्ण मालमत्ता रिकाम्या करून धोकादायक भाग तातडीने उतरवून घ्याव्यात / दुरुस्त करून घ्याव्यात दुरुस्त करणे कामी नियमानुसार नगरपरिषदेची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील. वादळ पावसामुळे इमारती अचानक पडून जीवित अगर वित्त हानी होणार नाही. याकामी सर्व नागरिकांना अधिनियमातील तरतुदीनुसार सदरची नोटीस देण्यात येत असून अश्या प्रकारे कार्यवाही न केल्याने दुर्दैवाने मालमता कोसळून काही जीवित अगर वित्त हानी झाल्यास त्यास संबंधीत मालमत्ताधारक / भाडेकरू भोगवटादार वैयक्तिक जबाबदार राहील यांची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

वरिलप्रमाणे आवश्यक कार्यवाही तातडीने करण्यात यावी.

मुख्याधिकारी
संगमनेर नगरपरिषद, संगमनेर


**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's

डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४

उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध

या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

## जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

**त्वरित पाहिजेत**

पेट्रोल पंप वर २ कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक उमेदवारांनी संपर्क करावा
पत्ता - चैतन्य पेट्रोलियम, संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी
8888808397

**पाहिजेत**

पुरुष रिसेप्शनिस्ट
अनुभवास प्राधान्य, बँकिंग व्यवहाराचे ज्ञान, संगणकाचे ज्ञान व स्वतःची दुचाकी व लायसन्स आवश्यक
संपर्क – नविन नगर रोड, संगमनेर
8378956909
8459199913

**पाहिजेत**

अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत
जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
9822523424

**पाहिजेत**

स्वयंपाकीन – ०१ (२ व्यक्तींचा स्वयंपाक)
ड्रायव्हर – ०१
क्लार्क – ०१ (लेडीज/जेन्ट्स)
वॉचमन – ०१
अनुभवास प्राधान्य
9822334431

**पाहिजेत**

पसायदान चिल्ड्रन क्लिनिक ॲण्ड नर्सिंग होम
ताजणे मळा, नविन नगर रोड, संगमनेर
डॉक्टर – BAMS / BHMS (सकाळ–१, रात्री –१)
नर्स – ANM / GNM (सकाळी –१, दुपारी–१, रात्री –२)
लॅब टेक्निशिअन (सकाळी –१, रात्री –१)
९९६०६१०६२३

**ड्रायव्हर पाहिजे**

ऑटोमॅटिक गाडीसाठी ०१ जागा
मॅन्युअल गेअर गाडीसाठी ०१ जागा
निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
8668269897

**गाळे भाडेतत्वावर देणे आहे**

शोरुम, ऑफीस, बँक किंवा कमर्शिअल वापरासाठी दोन गाळे भाडे तत्वावर देणे आहे
ग्राऊंड फ्लोअर – १७०० स्क्वे. फुट
फर्स्ट फ्लोअर – १७०० स्क्वे. फुट
पत्ता – नाशिक–पुणे हायवे, डेंटल कॉलेज समोर, घुलेवाडी, ता. संगमनेर
संपर्क - 7755965616, 9422737484

**त्वरित पाहिजेत**

ड्रायव्हर तसेच ऑफिस काम व साईट व्हिजिटसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
9421911671

**पाहिजेत**

डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी








# कलाभूषण रघुवीर खेडकर २५ मे रोजी होणार पदमश्रीने सन्मानित



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- अवघ्या महाराष्ट्रात तमाशा कलेच्या माध्यमातून लोकांचे मनोरंजन करणारे ज्येष्ठ कलाकार रघुवीर खेडकर यांना येत्या २५ मे रोजी देशाच्या अतिशय प्रतिष्ठित अशा पदमश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

केंद्रीय गृहमंत्रालयाच्या वतीने अवर गृहसचिव कमलेश रबिदास यांनी आजच (दि. १५) या सोहळ्याचे तपशील पाठवले आहेत. २५ मे रोजी सकाळी अकरा वाजता राष्ट्रपती भवनात पद्म पुरस्कार सोहळ्याची रंगीत तालीम होणार आहे तर त्याच दिवशी सायंकाळी राष्ट्रपती भवनात पाच वाजता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते रघुवीर खेडकर यांना पदमश्री पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

महाराष्ट्राची अस्सल लोककला अशी ओळख असलेल्या लोकनाट्य तमाशा क्षेत्रात रघुवीर खेडकर हे पद्म पुरस्कार मिळवणारे पाहिले कलाकार ठरले आहेत. दिल्ली येथे होणाऱ्या पद्म पुरस्कार सोहळ्याला रघुवीर खेडकर यांचे मानस बंधू डॉ. संतोष खेडलेकर आणि व्यवस्थापक शफी शेख हे सोबत असणार आहेत.

चौकट - माझे मानस बंधू डॉ. संतोष खेडलेकर यांनी आज दुपारी पद्म पुरस्काराचा इमेल आल्याचा फोन केला आणि माझे मन भूतकाळात गेले. माझे वडील तमाशामहर्षी तुकाराम खेडकर आणि आई कांताबाई सातारकर यांनी तमाशा क्षेत्रात घेतलेले कष्ट आठवले. स्वातंत्र्योत्तर काळात तमाशाला दिशा देण्याचे काम करणाऱ्या कलावंतांमध्ये माझ्या आई वडलांचे मोठे योगदान होते. माझा हा पुरस्कार मी या दोघांच्या चरणी अर्पण करतो.

# राज्यातील धरणांमध्ये ३४ टक्के उपयुक्त पाणीसाठा

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- राज्यातील लहान, मध्यम आणि मोठी मिळून एकूण ३०२८ धरणांमध्ये १५ मे २०२६ अखेर सुमारे ३४.१० टक्के (४९१.८५५ टीएमसी) इतका उपयुक्त (लाईव्ह) पाणीसाठा शिल्लक असल्याची माहिती जलसंपत्ती अभ्यासक व जलसिंचन तज्ज्ञ इंजि. हरिश्चंद्र चकोर यांनी दिली. गतवर्षी १५ मे २०२५ रोजी राज्यातील धरणांमध्ये २९.२० टक्के (४२१.१७७ टीएमसी) इतकाच उपयुक्त पाणीसाठा होता. यावर्षी त्यात ४.९० टक्के, म्हणजेच ७०.६७८ टीएमसीने वाढ झाली आहे.

राज्यात सर्वाधिक ४४.३३ टक्के पाणीसाठा अमरावती विभागात, तर सर्वात कमी २५.५६ टक्के पाणीसाठा पुणे विभागात असल्याचे दिसून येते. जायकवाडी धरणातील पाणीसाठा गेल्या पंधरा दिवसांत ३.८६ टीएमसीने घटला असला, तरी तो गतवर्षीपेक्षा सुमारे १० टक्क्यांनी अधिक असल्याचे सकारात्मक चित्र आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रमुख १३ प्रकल्पांमध्ये एकूण २१.९० टीएमसी पाणीसाठा असून, तो गतवर्षीपेक्षा ४ टीएमसीने अधिक आहे. इंजि. चकोर यांनी सांगितले की, यंदाचा रब्बी हंगाम संपला असून उन्हाळी हंगाम सुरू आहे. उपलब्ध पाणीसाठा लक्षात घेता, सिंचन आणि पिण्याच्या पाण्याचा मोठा ताण निर्माण होण्याची शक्यता कमी असली, तरी वाढते तापमान आणि बाष्पीभवनामुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणात व्यय होऊ शकतो. विशेषतः जायकवाडी प्रकल्पामध्ये दररोज सुमारे ८० दलघफू बाष्पीभवन होत असून, महिन्याला जवळपास २.५० टीएमसी पाण्याचा व्यय होऊ शकतो. १ जुलै २०२५ ते १५ मे २०२६ या कालावधीतच धरणात ११.५८ टीएमसी पाण्याचे बाष्पीभवन झाल्याची नोंद आहे.

येत्या पावसाळ्यात पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली असल्याने, ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत पिण्याच्या पाण्याचे नियोजन करण्याची गरज निर्माण झाली आहे. राज्याचे जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी पिण्याच्या पाण्याचे आरक्षण सुनिश्चित करण्यासाठी संबंधित विभागांना आवश्यक सूचना दिल्या असून, प्रशासनानेही त्यानुसार तयारी सुरू केली आहे.

### जिल्ह्यातील प्रमुख धरणांतील साठा

भंडारदरा - ३८९९ दलघफू (३५.३२%), निळवंडे - २६६१ दलघफू (३१.९८%), मुळा - ११४२० दलघफू (४३.९२%), आढळा - ५१६ दलघफू (४८.६८%), सीना - १०९५ दलघफू (४५.६३%), घोड - १३३२ दलघफू (२२.२८%), भोजापूर - ११ दलघफू (३.०५%)

### राज्यातील महसुली विभागांमधील पाणीसाठ्याची स्थिती

कोकण विभाग : १७३ धरणे - ४९.८०१ टीएमसी (३८.०६%), नाशिक विभाग : ५३९ धरणे - ७३.७०४ टीएमसी (३५.०४%), पुणे विभाग : ७२४ धरणे - १३७.६८७ टीएमसी (२५.५६%), मराठवाडा विभाग : ९२९ धरणे - १००.५३६ टीएमसी (३९.०७%), अमरावती विभाग : २७६ धरणे - ६१.४६५ टीएमसी (४४.३३%), नागपूर विभाग : ३८७ धरणे - ६८.६६३ टीएमसी (४१.२०%)

### प्रमुख धरणांची स्थिती

**जायकवाडी – ३२.८५९ टीएमसी (४२.८६%)**
**कोयना – १९.०४८ टीएमसी (१९.०२%)**
**उजनी – (–)६.०८० टीएमसी (मृतसाठा) (–११.३५%)**

तसेच, यावर्षी महाराष्ट्रात जूनच्या दुसऱ्या आठवड्यात मान्सून दाखल होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

# अभ्यासासाठी वाजतो शिस्तीचा भोंगा!

## खांडगाव ग्रामपंचायतीचा विद्यार्थ्यांसाठी अभिनव उपक्रम



खांडगाव ग्रामपंचायत कार्यालयावरील 'अभ्यासाचा भोंगा'

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- खांडगाव (ता. संगमनेर) ग्रामपंचायतीने शालेय विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी एक आगळावेगळा आणि नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून संपूर्ण तालुक्याचे लक्ष वेधून घेतले आहे. 'अभ्यासाचा भोंगा' या उपक्रमामुळे विद्यार्थी वेळेवर घरी परतून मोबाईल व टीव्ही बंद करून नियमित अभ्यास करत असल्याचे सकारात्मक चित्र सध्या गावात दिसून येत आहे.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत खांडगाव ग्रामपंचायतीने विविध विकासात्मक उपक्रम हाती घेतले असून, गाव हळूहळू विकासाचे मॉडेल ठरत आहे. याच अभियानाचा भाग म्हणून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी ग्रामपंचायतीने हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. गावातील विद्यार्थी संध्याकाळच्या वेळेत मोबाईल, टीव्ही किंवा खेळामध्ये अधिक वेळ घालवत असल्याचे लक्षात आल्यानंतर ग्रामपंचायत कार्यालयाच्या इमारतीवर भोंगा बसवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार हा भोंगा बसवण्यात आला आहे. दररोज नेमक्या संध्याकाळी सात वाजता तो वाजवला जातो.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायत कार्यालयावर हा भोंगा बसवण्यात आला आहे. दररोज संध्याकाळी सात वाजता भोंगा वाजवला जातो. त्याचा आवाज दोन किलोमीटरपर्यंत जात असल्याने विद्यार्थी त्वरित अभ्यासाला बसतात. पालकांनाही याबाबत सहकार्य करण्याच्या सूचना दिल्या आहेत. संपूर्ण तालुक्यात शालेय विद्यार्थ्यांसाठी असा उपक्रम राबवणारी खांडगाव ही पहिली ग्रामपंचायत ठरली आहे.

अॅड. विकास गुंजाळ (सरपंच, खांडगाव)

पूर्वी संध्याकाळी खेळून आल्यावर टीव्ही पाहण्यात किंवा मोबाईलवर गेम खेळण्यात खूप वेळ जायचा. पण आता सात वाजता भोंगा वाजला की, आम्हाला समजते की अभ्यासाची वेळ झाली आहे. आम्ही लगेच टीव्ही, मोबाईल बंद करतो आणि अभ्यासाला बसतो. या भोंग्यामुळे आमची अभ्यासाची एक छान सवय झाली आहे.

कु. मोनिका गुंजाळ (विद्यार्थिनी इयत्ता ७ वी)

# कांद्याला १२ रूपये हमीभाव देणार - मुख्यमंत्री



मुंबई (वार्ताहर)- राज्यात कांद्याचे दर कोसळल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. आखाती देशातील युद्ध, निर्यात बंदी आणि निसर्गाच्या प्रकोपामुळे कांद्याचा खर्चही निघत नसल्याने कांदा उत्पादक शेतकरी आज प्रचंड आर्थिक संकटात सापडला आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने तातडीने कांद्याला किमान २ ते ३ हजार हमीभाव द्यावा तसेच प्रति क्विंटल १५०० रुपये अनुदान द्यावे. नाफेडमार्फत कांदा खरेदी सुरू करावी. केंद्र सरकारशी समन्वय साधून दीर्घकालीन स्थिर निर्यात धोरण लागू करावेत, अशा अनेक मागण्या शेतकऱ्यांकडून केल्या जात आहे. तसेच विरोधकांनीही याच मुद्द्यावर बोट ठेवत सरकारवर टीका केली आहे. एकंदरीत या सर्व पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी मोठी घोषणा केली आहे.

यावेळी बोलताना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले कि, केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह यांना विनंती केली आहे कि, आमचा कांद्याचा शेतकरी प्रचंड अडचणीत आहे, अनेक शेतकरी कांद्याला एक रुपये भाव मिळतो म्हणून कांदे फेकून द्यायला निघाले आहेत. म्हणून मी कृषीमंत्री शिवराज सिंह चौहानांना सांगितलं, काही झालं तरी कांदा विकत घ्या, कांद्याचं शेल्फ लाईफ जास्त नाही. त्याची खरेदी, साठवणूक करुन तो पुन्हा बाजारात आणायचा, हे सगळं अडचणीचं असतं. पण आपल्या विनंतीला मान देऊन आजपासून महाराष्ट्रात शिवराज सिंह चौहान आणि पंतप्रधान मोदीजींच्या नेतृत्वात १२ रुपये ३५ पैशांनी कांद्याची खरेदी सुरु होत आहे. हा कांद्याच्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा ठरेल. अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्र्यानी दिली आहे. सातारा येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णकृती पुतळ्याचे अनावरण कार्यक्रम सोहळ्यासाठी उपस्थिती लावली. यानंतर प्रधानमंत्री आवास योजनेच्या आणि घरकुल लोकार्पण सोहळयाच्या कार्यक्रमातही ते उपस्थित होते. यावेळी त्यांनी हि घोषणा केली आहे.

SUBSCRIBE YOUTUBE
Daily Yuvavarta

# शिर्डी लोकसभा युवासेना जिल्हा प्रमुखपदी अक्षय गुंजाळ



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी शिर्डी लोकसभेच्या (संगमनेर, अकोले, शिर्डी) युवासेना जिल्हा युवा प्रमुखपदी येथील युवा कार्यकर्ते, शिवसैनिक अक्षय गुंजाळ यांची नियुक्ती केली आहे.

युवासेनेच्या मध्यवर्ती कार्यालयातून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष व युवासेना सचिव आमदार वरुण सरदेसाई यांनी प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकाद्वारे ही माहिती कळविली आहे.

अक्षय गुंजाळ हे शिवसेनेचे निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. त्यांच्यावर पक्षाने युवा संघटनेची मोठी जबाबदारी सोपवली आहे. या जबाबदारीला ते योग्य न्याय देऊन संधीचे सोने करतील व शिर्डी लोकसभा मतदारसंघात युवकांचे संघटन अधिक मजबूत व क्रियाशील करतील असा विश्वास ज्येष्ठ नेत्यांनी व्यक्त केला. या निवडीचे संगमनेर सह शिर्डी लोकसभा मतदारसंघात स्वागत होत आहे. खा. भाऊसाहेब वाकचौरे यांच्यासह शिवसेनेच्या जेष्ठ नेत्यांनी अक्षय गुंजाळ यांना शुभेच्छा दिल्या आहेत.







मा. श्री. अक्षय शहाणे
शहाणे ज्वेलर्स



मा. अमर काळे पाटील
संचालक, लक्ष्मी फ्लेक्स



मा. श्री. सुनिल मादास
संचालक, मादास फ्लेक्स

शुभेच्छुक - दैनिक युवावार्ता

# बेरोजगार मंडळी झुरळासारखी

## न्यायालयाने ज्येष्ठ विधिज्ञाला फटकारले



नवी दिल्ली (वार्ताहर)- सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी आज देशभरातील बेरोजगार तरुणांची तुलना ही झुरळांशी केली. 'ही तरुण मंडळी पुढे जाऊन माध्यमं, समाजमाध्यमांमध्ये जातात, काहीजण माहिती अधिकार कार्यकर्ते (आरटीआय) बनून थेट व्यवस्थेवर हल्ले करू लागतात,' असे निरीक्षण त्यांनी नोंदविले.

सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. जॉयमल्ल्या बागची यांच्या खंडपीठाने एका वकिलाला 'वरिष्ठ अधिवक्ता' पदाचा पाठपुरावा केल्याबद्दल फटकारताना ही टिपणी केली. 'समाजात आधीच असे 'परजीवी' आहेत, जे व्यवस्थेवर हल्ला करतात,' असे सांगत खंडपीठाने याचिकाकर्त्यालाच विचारले की, 'त्याला त्यांच्याशी हातमिळवणी करायची आहे का?'

'संपूर्ण जग वरिष्ठ (अधिवक्ता) होण्यासाठी पात्र असू शकते, पण तुम्ही मात्र नाही. दिल्ली उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्याला वरिष्ठ अधिवक्ता पद बहाल केले, तर त्याचे व्यावसायिक वर्तन पाहून सर्वोच्च न्यायालय ते रद्द करेल,' असेही सरन्यायाधीश म्हणाले.

या सुनावणीवेळी सरन्यायाधीशांनी याचिकाकर्त्यांनी फेसबुकवर वापरलेल्या भाषेचाही उल्लेख केला. या प्रकरणामध्ये न्यायालयाने संबंधित विधिज्ञाच्या वर्तनाला तीव्र आक्षेप घेत नाराजी व्यक्त केली. यानिमित्ताने बार कौन्सिलच्या कार्यप्रणालीतील त्रुटींवरही न्यायालयाने बोट ठेवले आहे.

सरन्यायाधीश म्हणाले, ज्यांना कोणताही रोजगार मिळत नाही किंवा व्यवसायात स्थान मिळत नाही, त्यांच्यापैकी काही माध्यमे, काही समाजमाध्यमांत सक्रीय आहेत, तर काहीजण माहिती अधिकार कार्यकर्ते बनले आहेत आणि ते प्रत्येकावर हल्ला करू लागतात.

# पेटंट वाढीचा विरोधाभास

## भारतात खरोखर नवसंशोधन वाढतेय की फक्त आकडेवारी ?



**डॉ. एकनाथ बायस**
**अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालय, संगमनेर**




भारताने नवसंशोधन क्षेत्रात एक महत्त्वाचा टप्पा गाठला असून जगातील सहाव्या क्रमांकाचा सर्वाधिक पेटंट अर्ज दाखल करणारा देश म्हणून स्थान मिळवले आहे. केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी नुकतीच घोषणा केली की आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये भारतातून १.४३ लाखांहून अधिक पेटंट अर्ज दाखल करण्यात आले. मागील वर्षांच्या तुलनेत ही जवळपास ३० टक्क्यांची वाढ आहे. ही वाढ भारतातील संशोधन, तंत्रज्ञान आणि बौद्धिकसंपदा निर्मितीवरील नवसंशोधन क्षेत्रातील वाढती सक्रियता दर्शवत आहे. विशेष म्हणजे, एकूण अर्जांपैकी ६९ टक्क्यांहून अधिक अर्ज हे भारतीय संशोधक आणि संस्थांकडून दाखल करण्यात आले असून तामिळनाडू, कर्नाटक आणि महाराष्ट्र ही राज्ये आघाडीवर आहेत. नवसंशोधन आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देणाऱ्या सरकारी उपक्रमांमुळे भारताची ओळख केवळ सेवा क्षेत्रापुरती मर्यादित न राहता नवसंशोधनाधारित अर्थव्यवस्था म्हणून निर्माण होत आहे. भारतात निर्मित पासून भारतात शोधलेले या दिशेने भारताची प्रगती होत असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

मात्र, तज्ज्ञांच्या मते पेटंट अर्जांची वाढ ही नेहमीच दर्जेदार नवसंशोधनाचे लक्षण नसते. उपलब्ध आकडेवारीनुसार, २०२४-२५ मध्ये भारतीय अर्जदारांनी ६८,२०१ पेटंट अर्ज दाखल केले; परंतु त्यापैकी फक्त १०,६८२ पेटंट मंजूर झाले. याउलट, विदेशी अर्जदारांनी ४१,९४० अर्ज दाखल करून त्यापैकी २२,८२२ पेटंट मंजूर करून घेतले. दाखल आणि मंजूर पेटंटमधील हा मोठा फरक अनेक प्रश्न निर्माण करतो. अनेक पेटंट अर्जांमध्ये नावीन्य, तांत्रिक सखोलता किंवा व्यावसायिक उपयुक्तता कमी असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. विशेषतः उच्च शिक्षण संस्थांमध्ये पेटंट अर्जांची संख्या ही आता क्रमवारी, मानांकन आणि प्रसिद्धीसाठी महत्त्वाचा निकष बनली आहे. काही खासगी विद्यापीठांनी तर एकत्रित आयआयटी संस्थांपेक्षाही अधिक पेटंट अर्ज दाखल केल्याचे चित्र दिसत आहे.

तज्ज्ञांच्या मते यामुळे गुणवत्तेपेक्षा संख्येला अधिक महत्त्व दिले जात आहे. अनेक ठिकाणी पेटंट हे संशोधनाच्या गुणवत्तेचे नव्हे तर कामगिरीचे मोजमाप बनले आहे, असे एका बौद्धिकसंपदा सल्लागाराने सांगितले. पुरेशी मौलिकता किंवा उद्योगातील उपयुक्तता नसतानाही अनेक अर्ज दाखल केले जातात.उद्योग क्षेत्रातील निरीक्षकांच्या मते, दाखल झालेल्या पेटंटपैकी फारच कमी पेटंट प्रत्यक्ष उत्पादन, उद्योग किंवा यशस्वी नवउद्योगांमध्ये रूपांतरित होतात. ही परिस्थिती भारताच्या नवसंशोधन संस्कृतीतील व्यापक आव्हान दर्शवते. बौद्धिकसंपदा विषयी जागरूकता वाढली असली तरी खऱ्या अर्थाने नवसंशोधनासाठी दीर्घकालीन संशोधन, उद्योग सहकार्य, आर्थिक पाठबळ आणि प्रयोगशीलतेला प्रोत्साहन देणारी मानसिकता आवश्यक असते. जगातील अग्रगण्य नवसंशोधन अर्थव्यवस्था केवळ पेटंट संख्येवर नव्हे, तर त्या संशोधनाचा समाज आणि उद्योगावर झालेल्या परिणामावर मोजल्या जातात. तज्ज्ञांच्या मते भारतातील पेटंट वाढ ही सकारात्मक बाब असली तरी पुढील टप्प्यात पेटंटची गुणवत्ता, संशोधनाची सखोलता आणि व्यावसायिक परिणामकारकता यांवर भर देणे आवश्यक आहे.भारत पेटंट अर्जांच्या नव्या विक्रमांचा उत्सव साजरा करत असताना, खरा प्रश्न अजूनही कायम आहे, भारत पेटंटच्या संख्येला खऱ्या नवसंशोधन नेतृत्वात रूपांतरित करू शकेल का?




दैनिक **युवावार्ता**
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com









# घुलेवाडी सरपंच, उपसरपंचासह तीन सदस्य अपात्र

## अतिक्रमण प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांची कारवाई; सदस्यत्व रद्द



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी) - संगमनेर तालुक्यातील घुलेवाडी ग्रामपंचायतीतील चार सदस्यांविरोधात दाखल करण्यात आलेल्या अतिक्रमण प्रकरणात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील कलम १४ (१)(ज-३) व कलम १६ अंतर्गत कारवाई करत घुलेवाडीच्या सरपंच निर्मला कैलास राऊत, उपसरपंच दत्तात्रय चिमण राऊत, ग्रामपंचायत सदस्य अनिल बबन राऊत, बाजीराव लक्ष्मण पानसरे आणि सोनाली रवींद्र गिरी या पाच सदस्यांना अपात्र ठरवण्यात आले असून त्यांचे ग्रामपंचायत सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे.

घुलेवाडी गावातील शासकीय जागेवर अतिक्रमण करून त्याचा लाभ घेतल्याची तक्रार शिवसेना शाखाप्रमुख शरद पानसरे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्जाद्वारे केली होती. या तक्रारीनंतर झालेल्या चौकशीत गटविकास अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या अहवालात संबंधित चारही सदस्यांनी ग्रामपंचायतीच्या शासकीय जागेवर अतिक्रमण केल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच संबंधित जागेचा वापर हे सदस्य व त्यांच्या कुटुंबीयांकडून केला जात असल्याचेही स्पष्ट झाले. शासन मालकीच्या जागेवर बांधकाम करण्यात आल्याचे चौकशीत समोर आले असून या बांधकामाची नोंद ग्रामपंचायत सभेतील ठरावाद्वारे करण्यात आली होती. मात्र, ही नोंद बेकायदेशीररीत्या करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. याशिवाय सोनाली गिरी यांनी पदाचा गैरवापर केल्याचाही ठपका ठेवण्यात आला होता.

सुनावणीदरम्यान संबंधित सदस्यांनी वकिलामार्फत आपली बाजू मांडली. उपलब्ध कागदपत्रे, ग्रामपंचायतीचे ठराव, चौकशी अहवाल आणि इतर पुरावे तपासल्यानंतर जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी संबंधितांना ग्रामपंचायत सदस्य म्हणून राहण्यास अपात्र घोषित केले.

सोमवार, दि. ११ मे २०२६ रोजी झालेल्या सुनावणीनंतर हा निर्णय देण्यात आला. शासकीय अहवाल आणि उपलब्ध पुराव्यांमधून अतिक्रमण स्पष्ट झाल्याने सरपंच, उपसरपंच आणि तीन सदस्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# बिरोबा देवस्थानला ‘क’ वर्ग दर्जा

**आ.अमोल खताळ यांनी पालकमंत्री ना. विखे यांच्याकडे केलेल्या पाठपुराव्याला यश**



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी) : तालुक्यातील सावरचोळ मेंगाळवाडी येथील जागृत आणि भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या बिरोबा देवस्थानला ‘क’ वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा प्रदान करण्यात आला आहे. या साठी आमदार अमोल खताळ यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पाठपुरावा केला होता या पाठपुराव्याला यश आले आहे क वर्ग दर्जा मिळाल्यामुळे देवस्थानच्या विकासाला गती मिळणार आहे त्यामुळे भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

बिरोबा देवस्थान हे सावरचोळ मेंगाळवाडी तसेच अकोले-संगमनेर परिसरातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान मानले जाते. वर्षभर येथे दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येत असतात. यात्रोत्सव, धार्मिक कार्यक्रम आणि पारंपरिक उत्सवां मुळे या देवस्थानाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. शासनाकडून ‘क’ वर्ग दर्जा मिळाल्यामुळे मंदिर परिसरा तील पायाभूत सुविधा, रस्ते, पिण्याचे पाणी, स्वच्छता, भक्त निवास आणि इतर विकासकामांसाठीचा निधी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

दोन ते अडीच वर्षांपूर्वी महाविकास आघाडी सरकारच्या काळात प्रस्ताव दाखल केला होता परंतु त्यास यश येत नव्हते आम्ही सर्व ग्रामस्थ तसेच देवस्थान ट्रस्ट ने या देवस्थानला क वर्ग दर्जा मिळावा यासाठी आमदार अमोल खताळ यांच्याकडे मागणी केली त्यानुसार आमदार अमोल खताळ यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पाठपुरावा केला त्यानुसार जिल्हा नियोजनच्या बैठकीमध्ये या मंदिराला वर्ग दर्जा मिळाला त्यामुळे आमचा आनंद गगनात मावेनासा झाला असल्याचे सरपंच सुनीता कानवडे,संजय कानवडे, संपत कानवडे, सागर कानवडे यांच्यासह सावरचोळ मेंगाळवाडी ग्रामस्थांनी सांगितले

# हिलेदेव घाटात गाडी पलटी;एकाचा मृत्यू

## निष्काळजी वाहनचालका विरोधात गुन्हा दाखल




राजूर (प्रतिनिधी) मवेशी मार्गावरील हिलदेव घाटात झालेल्या अपघातप्रकरणी निष्काळजीपणे वाहन चालवून अपघात घडवल्याप्रकरणी चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अपघातात भगवंता बिंदू मुठे यांचा मृत्यू झाला असून, दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. २०० फूट खोल दरीत ही कार पडली. सातेवाडी येथील दत्तात्रय बिंदू मुठे यांनी राजूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

फिर्यादीचे मोठे भाऊ भगवंता बिंदू मुठे हे त्यांचा मुलगा सार्थक मुठे व संदीप एकनाथ बांगर यांच्यासह कारमधून राजूर येथे कामानिमित्त आले होते. त्यानंतर मवेशी येथे पाहुण्यांच्या हळदीच्या कार्यक्रमासाठी जात असताना हिलदेव घाटात हा अपघात झाला. फिर्यादीनुसार,

रात्री सुमारे १०.२० वाजण्याच्या सुमारास वाहनचालक संदीप बांगर याने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवत असताना रस्त्यावरील खड्डा चुकविण्याच्या प्रयत्नात वाहनावरील ताबा गमावला. त्यामुळे गाडी रस्त्याच्या डाव्या बाजूस उलटून दरीत गेली. अपघातात भगवंता मुठे यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने त्यांचा मृत्यू झाला. सार्थक मुठे यांच्या दोन्ही पायांना गंभीर दुखापत झाली असून, संदीप बांगर यालाही

हातापायाला मार लागला आहे. स्थानिक सुरेश भांगरे, शंकर साबळे, मुकुंद तळपाडे नागरिकांनी जखमींना वाहनातून बाहेर काढून रुग्णवाहिकेतून उपचारासाठी हलविले.

या प्रकरणी राजूर पोलिस ठाण्यात संबंधित वाहन चालकाविरोधात निष्काळजीपणे वाहन चालवून अपघात घडविल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.











धर्मवीर संभाजीराजे तरूण मित्र मंडळ, संगमनेरचे अध्यक्ष तसेच संगमनेर तालुका वृत्तपत्र विक्रेता असोसिएशनचे अध्यक्ष सतीश आहेर यांच्या वाढदिवसनिमित्त विधानपरिषद आमदार सत्यजीत तांबे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.










दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25